पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे । महिलांसाठी पादत्राणे । मुलांसाठी पादत्राणे क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES लिबर्टी शूज एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस सारडागल्ली, अ.नगर मो : 9881531536

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर,मंगळवार दि. २९.०९.२०२६ | अंक नं. १५३ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चलो दुबई
चलो दुबई योजने अंतर्गत
दुबई ट्रिपचे मानकरी
सुभाष रेवजी दरेकर
बोल्हेगांव , अहिल्यानगर

चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

## अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीसाठी ५२७ अर्जांची विक्री; आ.प्राजक्त तनपुरे, राहुल जगताप यांच्यासह एका महिलेचा अर्ज दाखल



उमेदवारी अर्ज दाखल करताना माजी आमदार प्राजक्त तनपुरे.

नगर – जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास २८ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला आहे. २८ सप्टेंबर रोजी अर्ज विक्रीच्या पहिल्याच दिवशी विक्रमी ३६१ अर्जांची विक्री झाली तर २९ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत १६६ असे एकूण ५२७ उमेदवारी अर्जांची विक्री झाली. तर २९ सप्टेंबर रोजी राहुरी विकास सोसायटी मतदारसंघातून आमदार प्राजक्त तनपुरे यांनी, तर कर्जत महिला मतदारसंघातून महिला उमेदवार क्षीरसागर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती सांगण्यात आली. तसेच २८ सप्टेंबर रोजी माजी संचालक राहूल जगताप यांनीही अर्ज दाखल केला आहे.

२८ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या निवडणूक प्रक्रियेत पहिल्याच दिवशी विक्रमी ३६१ अर्जांची विक्री झाली होती, तर माजी संचालक राहुल जगताप यांनी पहिल्या दिवशीच आपला उमेदवारी अर्ज दाखल करून राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले होते. त्यानंतर आज दुसऱ्या दिवशीही अर्जांची विक्री आणि अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगात सुरूच राहिली. या निवडणुकीसाठी ५ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत आहे.

माजी मंत्री व आमदार प्राजक्त तनपुरे यांनी कार्यकर्त्यांसह येत आपला उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला. राहुरी विकास सोसायटी मतदारसंघातून तनपुरे यांनी अर्ज दाखल केल्याचे सांगण्यात आले. महिला मतदारसंघातून कर्जत येथील क्षीरसागर यांचा अर्ज दाखल झाला असल्याचे समजते.

जिल्हा बँकेच्या एकूण २१ संचालकांच्या जागेसाठी ही निवडणूक होत असून, अहिल्यानगर येथील बँकेच्या चाहुराणा शाखेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय थाटण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी सेवा सोसायटी मतदारसंघांतर्गत जिल्ह्यातील १४ तालुक्यांचे १४ मतदारसंघ आहेत. याशिवाय बिगरशेती संस्था, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि महिला राखीव मतदारसंघांचा यात समावेश आहे. प्रत्येक मतदारसंघासाठी उमेदवारी अर्जाची किंमत १०० रुपये असून २ हजार रुपये अनामत रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

### बिनविरोधच्या प्रयत्नांना खो बसणार?

जिल्हा बँक बिनविरोध करण्यासाठी एकीकडे प्रयत्न सुरू असतानाच श्रीगोंदा सोसायटी मतदारसंघातील इच्छुक आणि संगमनेर येथील बिनविरोध समझोता बैठकीला गैरहजर राहिलेले बँकेचे माजी संचालक राहुल जगताप यांनी पहिल्याच दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. त्याशिवाय प्राजक्त तनपुरे यांनीही अर्ज दाखल केल्यामुळे बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांना खो बसणार असल्याची चर्चा आता सुरु झाली आहे. बँक निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू असले, तरी मोठ्या संख्येने होत असलेली अर्जांची विक्री आणि दिग्गज नेत्यांनी पहिल्याच टप्प्यात दाखल केलेले अर्ज पाहता, माघारीच्या मुदतीपर्यंत निवडणुकीत मोठी रंगत आणि नाट्यमय घडामोडी घडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून लष्करी जवानाची आत्महत्या

### जामखेड रोडवरील लष्करी वसाहतीतील घटना, दोघांवर गुन्हा दाखल

नगर – भिंगार परिसरातील जामखेड रोडवर असलेल्या लष्करी वसाहतीत वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून एका लष्करी जवानाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना २८ सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली आहे. आप्पाराव महादेव ठोंबरे (वय ३४, रा. क्वार्टर नं.१४३/२, क्लीन्स लाईन, आर्मी हॉस्पिटल मागे, जामखेड रोड, मूळ रा. दहिफळ वडमावली, ता. केज, जि.बीड) असे मृत जवानाचे नाव आहे.याप्रकरणी मृत जवानाच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून दोन सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत आप्पाराव महादेव ठोंबरे हे अहिल्यानगर-मधील आर्मी एरियात कार्यरत होते. आरोपी नायब सुमेदार निलकमल आणि हवालदार सचिन खेडकर हे त्यांना कामाच्या ठिकाणी वारंवार मानसिक त्रास देत होते. आरोपींनी मयताच्या पत्नीविषयी अयोग्य उद्गार काढून तिला आपल्याकडे पाठवण्यास सांगितले होते. तसेच, नोकरीत व्यवस्थित काम करू देणार नाही, वरिष्ठांकडे तक्रार करून अडचणीत आणू आणि हवी ती रजा मिळू देणार नाही, अशी धमकीही दिली होती.

या सततच्या अपमानास्पद वागणुकीला आणि मानसिक त्रासाला कंटाळून आप्पाराव ठोंबरे यांनी आर्मी एरियातील कॉर्टरमध्ये २८ सप्टेंबर रोजी सकाळी गळफास घेत आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

या प्रकरणी मयत जवान ठोंबरे यांच्या पत्नी लक्ष्मी आप्पाराव ठोंबरे यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी नायब सुभेदार निलकमल आणि हवालदार सचिन खेडकर यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ३५१(२) आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख करत आहेत. सैन्य दलातील या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून पोलीस प्रशासनाकडून कसून तपास सुरू आहे.




गणेशोत्सवात लावलेले फ्लेक्स हटविताना महापालिका कर्मचारी.

## मनपाच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने हटविले गणेशोत्सवापूर्वी लावलेले अनधिकृत फ्लेक्स, बॅनर्स

नगर – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात विनापरवाना व अनधिकृतपणे लावले गेलेले राजकीय आणि इतर फ्लेक्स, बॅनर्स हटवण्याची मोहीम महानगरपालिकेच्या वतीने राबवण्यात आली आहे. या मोहिमेत मनपाच्या पथकाने शेकडो अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स काढून जप्त केले.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार ही कारवाईची मोहिम राबविण्यात आली. अतिक्रमण प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण पथकाने शहराच्या मुख्य मार्गांवर आणि चौकाचौकांतून ही मोहीम राबवली. यामध्ये बालिकाश्रम रोड, सावेडी गाव, वैदूवाडी, पाईपलाईन रोड, एकवीरा चौक, श्रीराम चौक, भिस्तबाग, प्रोफेसर कॉलनी चौक तसेच तोफखाना पोलीस स्टेशन परिसरापर्यंतच्या सर्व लाईटचे खांब आणि सार्वजनिक ठिकाणच्या बेकायदेशीर फ्लेक्स बोर्ड हटविण्यात आले. या मोहिमेमुळे लटकलेल्या बॅनर्सपासून विद्युत खांब व रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला.

प्रभाग समिती क्रमांक ३ चे क्षेत्रीय अधिकारी अर्जुन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रभागातील ९ मोठे फ्लेक्स बोर्ड आणि २० साधे प्लास्टिक व कापडी बोर्ड जप्त करण्यात आले. प्रभाग समिती क्रमांक १ चे क्षेत्रीय अधिकारी राहुल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ३६ मोठे फ्लेक्स बोर्ड आणि ३० छोटे व कापडी बोर्ड हटवण्यात आले. कुष्ठधाम रोड आणि वैदूवाडी रोड चौकामधील मध्यभागातील स्ट्रीट लाईट पोलवर लावण्यात आलेले २ मोठे बोर्ड काढण्यात आले. या संपूर्ण कारवाईदरम्यान एकूण ३६ मोठे फ्लेक्स आणि विविध प्रकारची सामग्री जप्त करण्यात आली आहे.

मोहीम यशस्वी करण्यासाठी अतिक्रमण पथक प्रमुख आदित्य बल्लाळ, प्रभाग समिती ३ चे क्षेत्रीय अधिकारी अर्जुन जाधव आणि प्रभाग समिती १ चे राहुल साबळे यांनी परिश्रम घेतले. त्यांच्यासोबत अतिक्रमण पथकाचे अजित तारू, राहुल तनपुरे, दत्ता जाधव तसेच अतिक्रमण पथकाचे अधिकृत वाहन व कर्मचारी उपस्थित होते.

## माळीवाडा परिसरातील दुकानातून भरदिवसा रोकडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – अहिल्यानगर शहरातील गजबजलेल्या माळीवाडा परिसरातील श्री दत्त फ्लॉवर डेकोरेटर दुकानातून अज्ञात चोरट्याने भरदिवसा ३० हजार रुपयांची रोकड असलेली पर्स चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अलका दत्तात्रय भुतारे (वय ५८, रा. आनंदनगर, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिरासमोर श्री दत्त फ्लॉवर डेकोरेटर नावाचे दुकान आहे. २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्या दुकानात उपस्थित असताना ही घटना घडली.

फिर्यादी यांच्या दुकानातील रोख रकमेची पर्स कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून चोरून नेली. चोरट्याने नेलेल्या पर्समध्ये ५००, २०० आणि १०० रुपयांच्या नोटा तसेच १० व २० रुपयांचे ठोकळे मिळून एकूण ३० हजार रुपयांची रोकड होती.

या प्रकरणी फिर्यादी अलका भुतारे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) नुसार गुन्हा नोंदवला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पंडीत हे करत आहेत. भरदिवसा घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात छाती (फुप्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine) Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 1 ऑक्टोबर 2026 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत
जर आपणांस खालील व्याधी असल्यास
• फुफ्फुसाचे सर्व आजार • झोपे संबंधीचे सर्व विकार
• ॲलर्जी विकार • दमा • न्युमोनिया • न थांबणारा खोकला
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरूवारी अहिल्यानगर भेट
स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क : भरत : 8208783915

पाहिजेत
मार्केटिंग प्रतिनिधी : २ जागा
(अहिल्यानगर – १ जागा, छत्रपती संभाजीनगर – १ जागा)
मेडिक्लेम आणि पी.एफ. सुविधा उपलब्ध. चारचाकी वाहन लायसन्स आवश्यक.
प्रॉम्प्ट सेल्स अँड सर्व्हिसेस 9373967898
पत्ता: पी-४०, एमआयडीसी, अहिल्यानगर.

DCM SHRIRAM Growing with trust
Fenesta Better by Design
भारताची नंबर 1 खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड

uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Plot No.23, Industrial Estate, Kedgaon, Ahilyanagar-414005, Maharashtra.
Ph: 9860119223

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# रामवाडी येथे घरफोडी करत सोन्याचे दागिने चोरट्यांनी पळविले; गुन्हा दाखल

नगर - शहरातील रामवाडी परिसरात अज्ञात चोरांनी बंद घराचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विक्रम गणपत गायकवाड (वय ५२, रा. रामवाडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे रिक्षा चालवून आपला उदरनिर्वाह करतात. ते रामवाडी येथील आपल्या घरी असताना, २४ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहा ते २५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली.

अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास गायकवाड यांच्या बंद घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडले. त्यानंतर घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील डब्यात ठेवलेले सोन्याचे दागिने लांबवले. यात २६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, पता मणी, नक्षी मणी, मंगळसूत्र मणी आणि आईच्या गळ्यातील शंभर मणी व मोठा मणी असलेली पोत असा ऐवज चोरांनी चोरून नेला. या चोरी गेलेल्या दागिन्यांची एकूण किंमत ३६ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पो.नि.बालाजी वैद्य आणि तपास पथकाने घटनास्थळी भेट दिली. तसेच फॉरेन्सिक पथक, फिंगर प्रिंट तज्ज्ञ आणि डॉग स्कॉडला देखील पाचारण करून तांत्रिक पुरावे गोळा करण्यात आले. फिर्यादीने उशिरा फिर्याद दिल्याने २८ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत.

# जिल्हा बँक निवडणुकीतील बिनविरोधच्या राजकारणाविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक; निवडणूक लढविण्याचे आवाहन

नगर - अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिनविरोधच्या हालचालींवरून राजकीय वातावरण तापले आहे. सहकार चळवळीच्या भवितव्याचा प्रश्न उपस्थित करत वंचित बहुजन आघाडीने या निवडणुकीत मैदानात उतरण्याची भूमिका जाहीर केली आहे. बँकेवरील प्रस्थापित राजकीय शक्तींच्या वर्चस्वाला विरोध करून सहकार, संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी निवडणूक लढविण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी केले आहे.


योगेश साठे

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याच्या ऐतिहासिक सहकार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असल्याचे सांगत साठे यांनी बँकेच्या कारभारावर गंभीर आरोप केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, बँकेच्या एकूण ६ हजार ८९६ कोटी रुपयांच्या कर्जापैकी सुमारे ४० टक्के, म्हणजेच २ हजार ७०० कोटी रुपयांचे कर्ज १२ मोठ्या साखर कारखान्यांना देण्यात आले आहे. या कारखान्यांकडे ५७८ कोटी रुपयांहून अधिक थकबाकी असल्याचा दावाही त्यांनी केला.

लहान शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीसाठी कठोर भूमिका घेतली जाते; मात्र मोठ्या कर्जदारांकडील थकबाकीबाबत वेगळी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप साठे यांनी केला. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना अपेक्षित मदत मिळत नसल्याचा आरोप करत त्यांनी प्रस्थापित राजकीय नेत्यांनी सरकारविरोधात भूमिका घेण्याऐवजी स्वतःच्या राजकीय हितसंबंधांना प्राधान्य दिल्याचा दावा त्यांनी केला.

बिनविरोध निवडणुकीच्या माध्यमातून गावपातळीवरील विकास सोसायट्यांचे खच्चीकरण होऊन सभासद आणि कार्यकर्त्यांचा लोकशाही सहभाग कमी होण्याची शक्यता असल्याचा आरोपही साठे यांनी केला.

जिल्ह्यातील शेतकरी, विकास सोसायट्यांचे सभासद आणि सुशिक्षित तरुणांनी सहकार चळवळीच्या भवितव्याचा विचार करून एकत्र यावे, असे आवाहन योगेश साठे यांनी केले. बिनविरोधच्या नावाखाली होणाऱ्या राजकीय एकाधिकारशाहीला विरोध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सहकार क्षेत्रातील लोकशाही प्रक्रिया आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची असल्याचा दावा करत, बँकेच्या मतदारांनी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन साठे यांनी केले.

## शेअर बाजार सेन्सेक्स ६०० हून अधिक अंकांनी कोसळला

मुंबई - भारतीय शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशीही मोठी घसरण पाहायला मिळाली. २८ सप्टेंबर रोजी झालेल्या मोठ्या पडझडीनंतर २९ सप्टेंबर रोजी ही शेअर बाजाराची सुरुवात लाल रंगात झाली. किरकोळ घसरणीसह उघडल्यानंतर दोन्ही प्रमुख निर्देशांकांमध्ये विक्रीचा दबाव वेगाने वाढला. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचा सेन्सेक्स ६०० हून अधिक अंकांनी घसरला, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा (एनएसई) निफ्टी २२,६०० च्या पातळीवर व्यवहार करताना दिसला. बाजारातील या घसरणीमुळे अनेक दिग्गज कंपन्यांचे शेअर्स कोसळल्याचे चित्र पाहायला मिळाले.

२८ सप्टेंबरला पडझडीनंतर सेन्सेक्स ७२,७७१ च्या पातळीवर बंद झाला होता. त्यानंतर २९ सप्टेंबर रोजी बाजाराने ७२,६३३ अंकांवर व्यवहार सुरू केला; मात्र काही क्षणांतच घसरणीचा वेग वाढला. अवघ्या ५ मिनिटांत सेन्सेक्स ६०० हून अधिक अंकांनी घसरून ७२,१३६ च्या पातळीवर आला.

सेन्सेक्ससोबतच निफ्टीमध्येही मोठी घसरण नोंदवली गेली. ५० शेअर्सचा निफ्टी निर्देशांक आधीच्या बंद (२२,७८०) च्या तुलनेत किंचित घसरून २२,७३२ वर उघडला. परंतु, काही वेळातच तो २०० हून अधिक अंकांनी घसरून २२,५८० च्या पातळीपर्यंत खाली आला.

याआधी २८ सप्टेंबर रोजी ही भारतीय शेअर बाजारात मोठा भूकंप पाहायला मिळाला होता. दिवसभरात सेन्सेक्स १,१२४ अंकांनी कोसळून ७२,७७१ वर बंद झाला होता, तर निफ्टी २६० अंकांच्या घसरणीसह २२,७८० च्या पातळीवर स्थिरावला होता. त्यानंतर २९ सप्टेंबर रोजी मंथली एक्सपायरीच्या दिवशी भारतीय शेअर बाजारात मोठी पडझड पाहायला मिळत आहे. निफ्टी २२,७०० च्या खाली घसरल्याने आणि सेन्सेक्समध्ये मोठी तूट झाल्याने अवघ्या काही मिनिटांत गुंतवणूकदारांचे १ लाख ७० हजार कोटी रुपये पाण्यात गेले आहेत. जागतिक मंदीची भीती आणि क्रूड ऑइलच्या वाढत्या किमतींमुळे बाजार दबावाखाली आला आहे.

# जिल्हा बँक निवडणूक बिनविरोध करण्याचा निर्णय अयोग्य; बाळासाहेब थोरातांच्या भूमिकेवर सुरेश लगड यांचा आक्षेप

नगर - जिल्हा सहकारी बँकेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीत विखे गटासोबत जाण्याची आणि निवडणूक बिनविरोध करण्याची भूमिका काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी घेऊ नये, अशी स्पष्ट भूमिका बँकेचे सभासद तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुरेश लगड यांनी मांडली आहे. दुष्काळाचे कारण पुढे करून विखेंना सोबत घेणे योग्य नसून, यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चुकीचा संदेश जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.





ॲड. सुरेश लगड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, बाळासाहेब थोरात हे काँग्रेस पक्षाचे मोठे व जबाबदार नेते आहेत. महाराष्ट्र शासनात महसूल मंत्री म्हणून त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. कार्यकर्त्यांच्या प्रत्येक सुख-दुःखात ते सहभागी असतात. त्यांच्यासाठीच विखे कुटुंबाशी संघर्ष केला आहे. परंतु, आता एकाच कुटुंबात सर्व सत्तास्थाने केंद्रित करणे संयुक्तिक नाही. ज्या कुटुंबातील व्यक्ती मंत्री व माजी लोकप्रतिनिधी आहेत, त्यांना सामावून न घेता सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना व व्यक्तींना संधी देऊन निवडणूक लढवावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे. असे झाल्यास जिल्ह्यातील बँक सभासद थोरातांना नक्कीच धन्यवाद देतील, असेही त्यांनी नमूद केले.

अजूनही वेळ गेलेली नाही, असे सांगत ॲड. लगड यांनी सहकारापुढील एका मोठ्या आर्थिक समस्येकडे लक्ष वेधले आहे. जिल्ह्यातील १२ साखर कारखान्यांकडे तब्बल २ हजार ७०० कोटी रुपयांची थकबाकी असून, ही थकबाकी जिल्हा बँकेत जमा झाल्यास अनेक प्राथमिक कृषी पतसंस्थांना व सर्वसामान्य सदस्यांना मोठा आर्थिक फायदा होईल, असा दावा त्यांनी केला आहे. एका चांगल्या भावनेने आणि सहकाराच्या हितासाठीच आपण ही विनंती करत असल्याचे सांगत ॲड. सुरेश लगड यांनी थोरातांनी आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करावा, असे आवाहन ॲड. लगड यांनी केले आहे.

# जिल्हा बँकेच्या जेवणावळीवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

**गुलाबजामचे नमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले, केटरर्सला नोटीस**

नगर - जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच, सोमवारी पार पडलेल्या बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर एक धक्कादायक प्रकार समोर आला. सभेसाठी उपस्थित सभासद, पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसाठी आनंदधाम रोडवरील केशर गुलाब मंगल कार्यालयात तब्बल २ हजार लोकांच्या जेवणाचा बेत आखण्यात आला. मात्र, हे जेवण पुरवणाऱ्या केटरर्सकडे अन्न व औषध प्रशासनाचा (एफडीए) कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे उघड झाले. एफडीएच्या पथकाने भर दुपारी छापा टाकून ही कारवाई केली.

दरम्यान, एफडीएने गुलाब जामचा नमूना घेऊन प्रयोगशाळेत पाठवला आहे. गुप्त माहितीच्या आधारे, दुपारी २ वाजेच्या सुमारास अन्न सुरक्षा अधिकारी सा.अ. मुल्ला यांनी घटनास्थळी अचानक तपासणी केली. त्यावेळी संबंधित केटरर्सने अन्न सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून ही जेवणावळ चालवल्याचे निष्पन्न झाले. सध्या बँकेवर प्रशासकाची नियुक्ती असून, सहकार विभागाच्या अप्पर आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली कारभार चालवला जात आहे. असे असतानाही बँक व्यवस्थापनाने विनापरवाना केटरर्सला थेट २ हजार लोकांच्या जेवणाचे काम नेमके कोणाच्या आशीर्वादाने दिले, असा गंभीर सवाल उपस्थित होत आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून राज्यभरात अन्न भेसळ आणि सुरक्षेसंदर्भात कठोर मोहीम उघडली आहे. शहरातील तोफखाना पोलिस ठाणे असो किंवा जिल्हा परिषद त्यांनी अन्न वाटपासाठी एफडीएच्या अधिकृत पोर्टलवर अर्ज करून रितसर परवानगी घेतली होती. मात्र, आशिया खंडातील सर्वात मोठी ग्रामीण बँक म्हणून नावलौकिक मिरवणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती बँकेला एफडीएच्या नियमांचा पूर्ण विसर पडल्याचे या घटनेने स्पष्ट झाले आहे.

**'त्या' अधिकाऱ्यांचीही चौकशी होणार :** सण-उत्सव, मेळावे किंवा कोणत्याही जाहीर कार्यक्रमात अन्न वाटप करताना एफडीएकडे अधिकृत नोंदणी असलेल्या केटरर्सकडूनच सेवा घेणे कायद्याने बंधनकारक आहे. यासाठी विशेष पोर्टलची सुविधा असतानाही जिल्हा बँकेच्या या जेवणावळीत नियमांचे सर्रास उल्लंघन झाले. विनापरवाना केटरर्सला नोटीस बजावण्यात आली असून, हे काम देणाऱ्या बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी केली जाईल. त्यानंतर कलम ६३ अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. असे अन्न व औषध कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त गौरव जगताप यांनी सांगितले.

## सोन्या चांदीच्या दरात सलग दुसऱ्या दिवशी घसरण

नवी दिल्ली - सोने-चांदीच्या दरात २९ सप्टेंबर रोजी सलग दुसऱ्या दिवशी घसरण झाली आहे. इंडिया बुलियन ॲण्ड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम २४ कॅरेट सोने ५८० रुपयांनी घसरून १.४७ लाख रुपयांवर आले आहे. एक किलो चांदी १,३७३ रुपयांनी स्वस्त होऊन २.२२ लाख रुपयांवर आली आहे. दोनच दिवसांत सोन्याच्या किमतीत सुमारे ५ हजार रुपये आणि चांदीच्या किमतीत ११ हजार रुपयांची घसरण झाली आहे. सप्टेंबरमध्ये आतापर्यंत २८ दिवसांत सोने ९ हजार आणि चांदी १५ हजार रुपयांनी स्वस्त झाली आहे. ३१ ऑगस्ट रोजी सोने १.५६ लाख रुपये प्रति १० ग्रॅम होते, जे आता १.४७ लाख रुपयांवर आले आहे. त्याचप्रमाणे, १ किलो चांदीची किंमत २.३७ लाख रुपयांवरून घसरून २.२२ लाख रुपयांवर आली आहे.

## प्रेमलताबाई नाबरिया यांचे दु:खद निधन

भिंगार - जतीन हाईटस्, विजय लाईन चौक येथील रहिवासी



सौ. प्रेमलताबाई नाबरिया (वय ७३) यांचे २९ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बालकिशन नाबरिया यांच्या सून, सुभाष नाबरिया यांच्या पत्नी तर सचिन व स्वप्निल यांच्या त्या मातोश्री होत.

## रामचंद्र निर्मळ यांचे दु:खद निधन



राहुरी - येथील रामचंद्र चंद्रभान निर्मळ (वय ५५) यांचे २९ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आंबी, ता.राहुरी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या मागे आई, पत्नी, भाऊ, २ मुले, नातसुन, नातवंडे असा परिवार आहे. विशाल व सौरभ यांचे ते वडील होत.

## पै. देवीसिंग कुंतल यांचे अल्प आजाराने निधन

नगर - कायनेटीक चौकातील लक्ष्मीकृपा सोसायटीतील



रहिवासी पै. देवीसिंग पुरुषोत्तम कुंतल (वय ५८) यांचे २८ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सतपाल व संग्राम कुंतल यांचे ते वडील होत.

## मुक्ताबाई नक्का यांचे अल्प आजाराने निधन



पुणे - कोंढवा, पुणे येथील रहिवासी मुक्ताबाई बालाजी नक्का (वय ७०) यांचे २८ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बिबवेवाडी (पुणे) अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे, ३ मुली, जावई असा परिवार आहे. श्रीकांत नक्का यांच्या त्या मातोश्री होत.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत आणि रब्बीसाठी बियाणे व खते मोफत द्यावी : भारतीय किसान संघ

नगर - महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये यंदा पावसाचे अत्यल्प व असमान प्रमाण झाल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मराठवाडा, पश्चिम विदर्भ, सोलापूर, अहिल्यानगर तसेच राज्यातील जवळपास सर्वच भागांमध्ये पावसाअभावी खरीप पिके हातची गेली आहेत. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून ५० हजार रुपये द्यावेत आणि रब्बी हंगामासाठी बियाणे व खते मोफत देण्यात यावेत, अशी मागणी भारतीय किसान संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.


निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना दिलीप गोंदकर, सिंधू वाणी, निलेश चिपाडे, अनिल मते आदी.

या निवेदनात म्हटले आहे, खरीप हंगामासाठी जमीन मशागत, बियाणे, खते, औषधे, मजुरी, सिंचन, फवारणी, यंत्रसामग्री आदींवर शेतकऱ्यांनी केलेला संपूर्ण खर्च उत्पादन न मिळाल्यामुळे बुडाला आहे. त्यामुळे पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांच्या हातात भांडवल शिल्लक राहिलेले नाही. केवळ नेहमीच्या निकषांनुसार मिळणारी नुकसानभरपाई शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी पुरेशी ठरणार नाही, असे किसान संघाने निवेदनात म्हटले आहे.

खरीप हंगामातील बुडालेल्या भांडवलासाठी हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. ही मदत पारंपरिक नुकसानभरपाईपुरती मर्यादित न ठेवता खरीप हंगामात शेतकऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष उत्पादन खर्चाची भरपाई करण्याच्या उद्देशाने विशेष पॅकेज म्हणून शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी आहे. यामुळे शेतकऱ्यांना पुढील हंगाम सुरू करण्यासाठी किमान कामासाठी भांडवल उपलब्ध होईल, असे भारतीय किसान संघाने अहिल्यानगरचे जिल्हा मंत्री निलेश राजाराम चिपाडे यांनी स्पष्ट केले आहे.

खरीप हंगाम पूर्णपणे हातातून गेल्याने अनेक शेतकऱ्यांकडे रब्बीची पेरणी करण्यासाठी आर्थिक क्षमता राहिलेली नाही. त्यामुळे रब्बी हंगामासाठी बियाणे, रासायनिक खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये व आवश्यक कृषी निविष्ठांचा मोफत पुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.रब्बीची पेरणी करण्याची वेळ निघून जाण्यापूर्वीच ही सामग्री शेतकऱ्यांच्या गावपातळीवर उपलब्ध करून द्यावी, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पीक नुकसानीचे पंचनामे आवश्यक असल्यास प्रशासकीय प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळण्यास विलंब होऊ नये, याची दक्षता घेण्याची मागणी किसान संघाने केली आहे. तसेच पीक विम्याची नुकसान भरपाई प्रक्रिया तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई मिळवून द्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

खरीप उत्पादन पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकऱ्यांची परतफेड करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात घटली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जमाफी निकषात न येणार्या कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कर्जाचे पुनर्गठन आणि नवीन रब्बी पीक कर्ज उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पीक कर्जावर यापुढे काही काळ व्याज आकारणीस स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात कर्जमाफी योजनेतील प्रोत्साहन अनुदानाची रक्कम नियमित थकित असलेल्या सर्व शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत देण्याचे काम कासवगतीने सुरू असल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली असून, ही प्रक्रिया गतिमान करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दुष्काळाची परिस्थिती आणखी गंभीर झाल्यास टप्प्याटप्प्याने उपाययोजना करण्याची मागणीही भारतीय किसान संघाने केली आहे. त्यामध्ये पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा पाणी, बहुवार्षिक फळबागांच्या जतनासाठी धरण जलसाठ्यातील पाण्याची विशेष राखीव तरतूद, तसेच शेतीला प्रथम प्राधान्य देऊन त्यानंतर औद्योगिक व इतर क्षेत्रांना पाणी देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय पशुधन वाचवण्याची व शेती रोजगाराची हमी देण्याची तसेच नदी-नाले खोलीकरण आणि व्यापक जलसंधारणाची कामे हाती घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष दिलीप गोंदकर, उपाध्यक्ष सिंधू वाणी, जिल्हामंत्री निलेश चिपाडे, जिल्हा सहमंत्री अनिल मते, तसेच उषा शिंदे, ॲड. अरुण गायखे, किरण काळे, गंगाधर चौधरी, अशोक कोते, शिवाजी कातोरे, दिलीप कुलकणी, संभाजी शिंदे, अ.नि. चौधरी, रामभाऊ मुजमुले आदी शेतकरी उपस्थित होते.

# वारंवार गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या कुरेशी टोळीवर संघटीत गुन्हेगारीचे वाढीव कलम

नगर - अनेकदा कारवाई करूनही जामीनावर सुटल्यानंतर वारंवार बेकायदेशीरपणे गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या कोठला येथील कुरेशी टोळीवर भारतीय न्याय संहिता कलम १११ नुसार संघटीत गुन्हेगारीचे वाढीव कलम लावण्यात आले आहे. तोफखाना पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

तोफखान्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील, पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी, स.फौ. तनवीर शेख, पो.हे.कॉ अब्दुलकादर इनामदार, जालिंदर आव्हाड, पो.कॉ भापसे, शाकीर सय्यद यांच्या पथकाला २२ सप्टेंबर रोजी कोठला परिसरातील मस्तान शहा चौकात हॉटेल कुरेशीचा मालक समीर बाबुलाल कुरेशी हा कोठला झोपडपट्टी भागात कुरेशी नाष्टा सेंटरचे मागे त्याचे हस्तक यांचे वरवी महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास मनाई असताना देखील गोवंशीय जनावरांची कत्तल करुन त्याचे मांस स्वतःचे हॉटेल कुरेशी करिता तसेच इतरांना विक्री करण्याचे उद्देशाने जवळ बाळगून आहे अशी माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकून ५ लाख ४० हजार रुपयांचे २७०० किलो गोमांस, ४ धारदार सत्तूर, ५ धारदार चाकू, दोन इलेक्ट्रॉनिक वजन काटे असा एकूण ५ लाख ४६ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या कारवाईत समीर बाबुलाल कुरेशी (रा. बेपारी मोहल्ला, झेंडीगेट, अहिल्यानगर (फरार), नुर लाल सय्यद (वय ४२, रा. वकीलवाडी, प्रशांतनगर, केज, ता. केज, जि. बीड), जगदीश उर्फ सोनू कमद दास (वय ३६, मुळ रा. बोरदाह, दूर्गाघाटी, जि. पूर्व मेदनीपूर, राज्य - पश्चिम बंगाल) यांच्याविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशन येथे भा.न्या.सं. २०२३ चे कलम २२३, ३२९, ३२५, ४९ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम २०१५ चे सुधारित कलम ५, ५ (क), ९, ९ (अ), ११ प्रमाणे दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील हे करत आहेत

सदर गुन्ह्याचा सखोल तपासादरम्यान सामी समीर कुरेशी, आबेद बाबुलाल कुरेशी, मुजाहित उर्फ भा. कुरेशी (सर्व रा. रा. बेपारी मोहल्ला, झेंडीगेट, अहिल्यानगर) यांचा देखील गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे गुन्ह्यात नाव वाढविण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील यांनी तपासादरम्यान हस्तगत केलेल्या पुराव्यावरून असे दिसून येते की, सदर गुन्ह्यातील टोळी प्रमुख समीर बाबुलाल कुरेशी याने त्याचे टोळीतील सदस्यांसह स्वतः व टोळीतील सदस्यां करवी बेकायदेशीर आर्थिक व इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने तसेच अशाच प्रकारचे गुन्हे करून निर्माण झालेली दहशत कायम ठेवण्यासाठी एकट्याने अगर संयुक्तपणे त्यांचे बेकायदेशीर कृत्य सुरू ठेवलेले आहे. तसेच सदर गुन्हेगार टोळीचा टोळीप्रमुख व संघटनेचे सदस्य यांना वेळोवेळी गुन्ह्यात अटक केल्यानंतर व न्यायालयांतून जामीनवर सुटल्यावर देखील त्यांनी गुन्हे करणे सुरुच ठेवले आहेत.

तसेच ते स्वतःच्या उपजीविकेसाठी कोणताही कायदेशीर कामधंदा करत नाही. वरील परिस्थितीचा व उपलब्ध पुराव्यांचा विचार करून सदर गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १११ (संघटित गुन्हा) हे वाढीव कलम लावणे करिता तोफखाना पोलीस स्टेशन मार्फत अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांचे कडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. आरोपीतांची गुन्हेगारी टोळीचा बिमोड करून त्यांची दहशत संपुष्टात आणण्या करीता अप्पर पोलीस अधीक्षक यांनी सदर गुन्ह्यास भारतीय न्याय संहितेचे कलम १११ हे वाढीव कलम लावण्याची परवानगी दिल्याने सदर गुन्ह्यास भारतीय न्याय संहितेचे कलम १११ लावण्यात आले आहे

ही कारवाई पो.नि बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील, पो.कॉ. हेमंत झिने, पो.कॉ. अनिल रोकडे व तोफखाना पोलीस स्टेशनचे अंमलदार यांनी केली आहे.भविष्यात देखील तोफखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्यांच्यावर देखील तोफखाना पोलीस स्टेशन मार्फत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले.

# गृहिणी

## आरोग्य

### उपाशीपोटी चहा घेत असाल तर...

सकाळी उठताच रिकाम्या पोटी चहा पिणे ही आपल्यातील बऱ्याच लोकांची सवय झाली आहे पण ही सवय दिसायला साधी वाटत असली तरी शरीराला आतून पोखरून काढते. रात्रभर पोट रिकामे असते आणि पोटात आम्ल तयार झालेले असते अशा वेळी त्यात गरम चहा गेला की आम्लाचे प्रमाण अधिकच वाढते. त्यामुळे छातीत जळजळ होणे, सारखे आंबट ढेकर येणे, मळमळ होणे, डोके दुखणे आणि पित्ताचा त्रास सुरू होतो. चहामध्ये नैसर्गिकरित्या काही असे घटक असतात जे पोटाच्या नाजूक आवरणावर थेट परिणाम करतात, रोजच्या रोज हा त्रास झाल्याने पोटाच्या आत जखम किंवा व्रण तयार होऊ शकतात आणि पुढे जाऊन हा त्रास गंभीर रूप धारण करतो.रिकाम्या पोटी चहा प्यायल्याने पचनसंस्थेचे पूर्ण चक्र बिघडून जाते. भूक लागत नाही, खाल्लेले अन्न नीट पचत नाही, पोट गच्च झाल्यासारखे वाटते आणि शौचाला साफ होत नाही. अनेकांना सकाळी चहा प्यायल्याशिवाय शौचाला होत नाही अशी सवय लागते जी पुढे जाऊन सवयीची बद्धकोष्ठता बनते. चहा हा शरीरातील पाणी शोषून घेतो त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते, तोंडाला कोरड पडते, थकवा येतो, चिडचिड वाढते आणि दिवसभर अस्वस्थ वाटते. सततच्या या सवयीने दातांच्या आरोग्यावरही परिणाम होतो दातांचा नैसर्गिक पांढरेपणा जातो, दात पिवळसर होतात, हिरड्या कमकुवत होतात आणि तोंडाला वास येऊ लागतो. हाडे ठिसूळ होणे आणि झोप न लागणे यामागेही अनेकदा हीच सवय कारणीभूत असते.म्हणून सकाळची सुरुवात चहाने कधीही करू नये. उठल्यावर सर्वप्रथम एक ते दोन ग्लास कोमट पाणी प्यावे त्याने पोट साफ होण्यास मदत होते आणि शरीरातील घाण बाहेर टाकली जाते. त्यानंतर चार पाच भिजवलेले बदाम, एखादे फळ किंवा बिस्कीट असे हलके काहीतरी खावे आणि त्यानंतर अर्ध्या तासाने चहा घ्यावा. चहा नेहमी कमी साखरेचा आणि कमी दुधाचा घ्यावा आणि दिवसातून दोन वेळेपेक्षा जास्त चहा टाळावा म्हणजे आरोग्य चांगले राहील.

## पाककला

### ठेचा पराठा

**साहित्य :** गव्हाचे पीठ २ वाटी, हिरव्या मिरच्या ८ ते १०, लसूण पाकळ्या १० ते १२, शेंगदाणे २ चमचे, जिरे १/२ चमचा, कोथिंबीर १ वाटी बारीक चिरलेली, दही २ चमचे, तेल २ चमचे, मीठ चवीनुसार, पराठा भाजण्यासाठी तूप किंवा तेल.

**कृती :** प्रथम हिरव्या मिरच्या, लसूण, शेंगदाणे, जिरे आणि मीठ खलबत्त्यात किंवा मिक्सरमध्ये जाडसर वाटून ठेचा तयार करून घ्या. त्यात बारीक चिरलेली कोथिंबीर मिसळा. एका परातीत गव्हाचे पीठ घ्या, त्यात तयार ठेचा, २ चमचे दही, २ चमचे तेल आणि चवीनुसार मीठ घालून मिश्रण एकजीव करा. थोडे थोडे पाणी घालून मध्यम सैलसर पीठ मळून घ्या आणि १५ मिनिटे झाकून ठेवा. मळलेल्या पिठाचे समान गोळे करा. एक गोळा घेऊन कोरड्या पिठावर लाटून जाडसर पराठा लाटा. तवा गरम करून त्यावर पराठा टाका, दोन्ही बाजूंनी तूप किंवा तेल लावून मध्यम आचेवर खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत भाजून घ्या. तयार गरमागरम ठेचा पराठा दही, लोणचे किंवा शेंगा चटणीबरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

### भिंत कॉमन असेल तर...

* जेव्हा तुमच्या घराची आणि शेजाऱ्याच्या घराची टॉयलेट, किचन किंवा बेड एकाच कॉमन भिंतीला लागून असते तेव्हा नकारात्मक ऊर्जा शेअर होते.

* कॉमन भिंतीला ओलावा येत असेल तर तो लगेच काढा. वास्तूमध्ये ओली भिंत ही पैशांची अडचण आणि आजारपण आणते.

* कॉमन भिंतीला लागून देवघर किंवा तिजोरी कधीच ठेवू नका. त्यासाठी नेहमी आतली स्वतंत्र भिंत निवडा.

## सौंदर्य

केसांना मधोमध भांग पाडणे आणि खूप काळा डाय लावणे वय जास्त दाखवते. थोडा लेयर कट तरुण दाखवतो.

## सल्ला

मायक्रोव्हेव्ह नसतानाही पिझ्झा, समोसा, वडापाव गरम करण्यासाठी तवा गरम करा, त्यावर पदार्थ ठेवा वर एक मोठे भांडे किंवा झाकण ठेवा आणि बाजूने थोडे पाणी शिंपडा. पदार्थ २ मिनिटात आतून वाफेने गरम होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६**

**चतुर्थी - पंचमी श्राद्ध, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, भरणी ०७।३७, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज दिवस धावपळीचा राहील. अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** जुन्या मित्राची भेट होईल. कामात यश मिळेल.

**मिथुन :** मन प्रसन्न राहील. कुटुंबासोबत वेळ चांगला जाईल.

**कर्क :** कामाचा ताण वाढेल. प्रवासाचे योग आहेत.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल. नवीन संधी मिळेल.

**कन्या :** खर्च वाढण्याची शक्यता आहे. नोकरीत बदल घडेल.

**तूळ :** प्रेमसंबंधात गोडवा येईल. व्यवसायात फायदा होईल.

**वृश्चिक :** शत्रूंपासून सावध राहण्याचा दिवस आहे. अचानक बातमी मिळेल.

**धनु :** भाग्य तुमच्या बाजूने राहील. शिक्षणात प्रगती होईल.

**मकर :** घरात शुभकार्य घडेल. आर्थिक स्थिती सुधारेल.

**कुंभ :** नवीन ओळखी होतील. दिवस आनंदात जाईल.

**मीन :** मनातील इच्छा पूर्ण होईल. आरोग्य चांगले राहील.

## शब्दगंध क्र. ७५२६ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | |
| ७ | | | ■ | ८ | | | ■ |
| | ■ | ■ | ९ | ■ | १० | | ११ |
| १२ | १३ | | | १४ | ■ | १५ | |
| १६ | | ■ | १७ | | ■ | | ■ |
| १८ | | १९ | ■ | २० | २१ | | ■ |
| | ■ | | ■ | २२ | | | |
| २३ | | | ■ | | ■ | | ■ |

**आडवे शब्द :-** १) एक हिंदी चित्रपट निर्माता व दिग्दर्शक ज्याने इमारतीवरून उडी टाकून आत्महत्या केली ७) नजीक; समीप ८) सूर्यो दयानंतरचा काही काळ १०) कागदाचा चतुर्थांश स्तंभ १२) गरम मसाल्यातील एक पदार्थ १५) मख; यज्ञ; यजन १६) मस्ती; जोर १७) रममाण; मग्न; लीन; गुंग १८) चिंतन; ध्यान २०) कोकिळ; कोयीपासून बनविलेले एक वाद्य २२) वाघाचे ओरडणे २३) लाट; हुक्की; तरंग

**उभे शब्द :-** १) मजल करीत करीत टप्प्याटप्प्याने २) नूतन; नवीन ३) एक प्रकारचे गवत ४) रक्तवाहिनी; धमनी; नाडी; शीर ५) दक्षिणा; धर्मादाय; देणगी ६) रिकामटेकड्या स्त्रिया ९) मुस्लिम समाजातील एक आडनाव ११) एक विषारी साप १३) नभ; अंबर; आकाश १४) कितीही सांगितले तरी पुन्हा पुन्हा तीच चूक करणारा; निलाजरा; निर्लज्ज १९) कालवा; पाट २१) मित्र; दोस्त; सोबती

### शब्दगंध क्र. ७५२५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हो | त | क | रू | ■ | हे | का | ■ |
| म | ज | ■ | प | र | बा | न | गी |
| ■ | बी | ■ | वा | सा | ■ | सा | र |
| बे | ज | ■ | न | य | न | ■ | ■ |
| लां | ■ | मो | ■ | न | ब | नी | त |
| टी | का | का | र | ■ | रा | ळ | ■ |
| ■ | र | ■ | ब | ता | ■ | कं | ठ |
| सा | ण | वा | र | ■ | पा | ठ | क |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** गर्दी सोबत चाललात तर गर्दीतच हरवाल, स्वतःचा रस्ता स्वतः तयार करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### झाडे जर सजीव असतात तर त्यांना ऐकू येते का?

हो माझ्या छोट्या मित्रांनो झाडांना आपले बोलणे ऐकू येते का हा प्रश्न अतिशय सुंदर आहे आणि या प्रश्नाचे उत्तर ऐकून आपल्याला खूप आश्चर्य वाटेल खरे तर झाडांना आपल्यासारखे कान नाहीत डोळे नाहीत तोंड नाही त्यामुळे ती आपला आवाज अगदी माणसासारखा शब्दां शब्दाने ऐकू शकत नाहीत आणि आपल्यासारखे उत्तर देखील देऊ शकत नाहीत पण याचा अर्थ असा नाही की त्यांना काहीच कळत नाही उलट झाडांना आपल्या पेक्षा जास्त गोष्टी जाणवतात जेव्हा आपण आपल्या घरातील एखाद्या छोट्याशा रोपाजवळ जातो अगदी प्रेमाने त्याच्या पानांवरून हात फिरवतो त्याला म्हणतो की अरे व्वा आज तू किती सुंदर दिसत आहेस तुझी पाने किती हिरवीगार आणि टवटवीत झाली आहेत तेव्हा आपल्या तोंडातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द हवेत एक अगदी नाजूक आणि हलकी अशी कंपने निर्माण करतो आणि ती कंपने हळू हळू तरंगत तरंगत त्या झाडाच्या पानांवर फांद्यांवर खोडावर आणि अगदी मुळांपर्यंत जाऊन पोहोचतात आणि त्या कंपनांचा अगदी कोमल स्पर्श त्या झाडाला होतो तेव्हा झाडाला आतून असे वाटते की कोणीतरी आपल्यावर प्रेम करत आहे आपली काळजी घेत आहे आणि मग त्या प्रेमाच्या भावने झाड अगदी आनंदून जाते आणि अधिक वेगाने आणि अधिक सुंदरपणे वाढू लागते.

मोठ्या मोठ्या विद्वान लोकांनी आणि संशोधकांनी यावर अतिशय रंजक प्रयोग करून पाहिले आहेत त्यांनी एकाच प्रकारची आणि एकाच आकाराची दोन छोटी रोपे आणली आणि दोन्ही रोपे दोन वेगवेगळ्या कुंड्यांमध्ये लावली त्यानंतर पहिल्या रोपाची त्यांनी अतिशय प्रेमाने काळजी घ्यायला सुरुवात केली रोज सकाळी त्याला पाणी देताना त्याच्याशी गोड गोड गप्पा मारल्या त्याला छान छान गोष्टी सांगितल्या कधी कधी त्याच्यासाठी मधुर गाणी देखील म्हणून दाखवली तर दुसऱ्या रोपाला मात्र तसेच ठेवून दिले त्याच्याजवळ कोणीच गेले नाही त्याच्याशी कोणीच बोलले नाही फक्त त्याला पाणी दिले गेले काही दिवसांनी काही आठवड्यांनी जेव्हा दोन्ही रोपांची तुलना केली तेव्हा सगळ्यांना खूप आश्चर्य वाटले कारण ज्या रोपाशी रोज प्रेमाने बोलले गेले होते ते रोप दुसऱ्या रोपापेक्षा खूप जास्त उंच वाढले होते त्याची पाने अधिक हिरवी अधिक मोठी आणि अधिक चमकदार झाली होती आणि त्याला सुंदर सुगंधी फुले देखील खूप लवकर आली होती तर दुसरे रोप मात्र थोडेसे सुकलेले आणि उदास दिसत होते यावरून आपल्याला हे नक्की कळते की झाडांना देखील आपले प्रेम आपली आपुलकी आपली माया सगळे काही मनापासून कळते फक्त ती बिचारी झाडे आपल्यासारखी बोलून आपला आनंद दाखवू शकत नाहीत ती आपला आनंद आपली पाने हलवून आपल्याला थंडगार सावली देऊन आपल्याला रंगीबेरंगी सुंदर फुले फुलवून आणि गोड गोड फळे देऊन दाखवतात म्हणून आपण सर्वांनी आपल्या अंगणातील झाडांवर खूप प्रेम करावे आपल्या घरातील तुळशीच्या रोपाला गुलाबाच्या झाडाला आंब्याच्या झाडाला रोज जाऊन भेटावे त्यांना वेळेवर पाणी द्यावे त्यांची पाने स्वच्छ करावी त्यांच्याशी आपल्या चांगल्या मित्राप्रमाणे रोज काही वेळ गप्पा माराव्या त्यांना एखादे गोडसे नाव ठेवावे म्हणजे ती सर्व झाडे आपल्याला आपला जीवाभावाचा खरा मित्र मानतील आणि आपल्याला आयुष्यभर फुले फळे ऑक्सिजन आणि थंडगार सावली देत राहतील.

एका छोट्याशा सुंदर गावात चिंटू नावाचा एक अतिशय हुशार मुलगा राहत होता चिंटूला नवीन नवीन चित्रे काढायची आणि नवीन गोष्टी बनवायची खूप आवड होती पण त्याच्या घरची परिस्थिती अतिशय गरिबीची होती त्याच्याकडे चित्र काढण्यासाठी चांगले रंग नव्हते मोठी वही नव्हती त्यामुळे तो नेहमी आपल्या घराच्या अंगणात उदास बसून राहायचा एके दिवशी त्याच्या गावामध्ये एका खूप ज्ञानी आजी आल्या त्यांनी चिंटूला असे उदास बसलेले पाहिले तेव्हा त्या आजी त्याच्या जवळ गेल्या आणि त्याला प्रेमाने विचारले की बाळा तू असा उदास का बसला आहेस तेव्हा चिंटू म्हणाला की माझ्याकडे काहीच नाही त्यामुळे मला काहीच करता येत नाही हे ऐकून आजी हसल्या आणि म्हणाल्या की अरे बाळा तुझ्याकडे जगातील

### कल्पनाशक्ती

सर्वात मोठा खजिना आहे तो म्हणजे तुझी कल्पना शक्ती आजीने त्याला समजावून सांगितले की डोळे बंद करून मनामध्ये आपल्याला हवे असलेले जग पाहणे आणि त्या जगाला प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करणे यालाच कल्पना शक्ती म्हणतात.

त्या दिवशी रात्री चिंटूने डोळे बंद केले आणि मनामध्ये एक खूप मोठा सुंदर राजवाडा पाहिला ज्या राजवाड्याच्या सगळ्या भिंती त्याने काढलेल्या सुंदर चित्रांनी भरल्या आहेत दुसऱ्या दिवसापासून चिंटूने आपल्या घराच्या अंगणातील जमिनीवर एका छोट्या काठीने चित्रे काढायला सुरुवात केली कधी तो जमिनीवर मोठा निळा समुद्र काढून स्वतः ला त्या समुद्रातील नावाडी समजायचा तर कधी आकाश काढून त्यामध्ये आपण विमान उडवत आहोत अशी कल्पना करायचा.

हळूहळू गावातील सगळी छोटी मुले त्याच्या भोवती गोळा होऊ लागली आणि त्याच्या कल्पनेच्या गोष्टी अगदी मन लावून ऐकू लागली काही वर्षांनी चिंटू मोठा झाला आणि आपल्या याच कल्पना शक्तीच्या जोरावर तो एक खूप मोठा आणि प्रसिद्ध चित्रकार झाला.

तात्पर्य - आपल्याकडे महागड्या वस्तू नसल्या तरी काही हरकत नाही पण जर आपल्या मनामध्ये प्रबळ कल्पना शक्ती असेल आणि त्या कल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण मनापासून मेहनत घेतली तर आपण आपले कोणतेही स्वप्न पूर्ण करू शकतो.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

जे कोणी सोंग वठवितात, ते खोटेपणा आणतात. ते वास्तवतः जसे नसते तसे प्रत्यक्षात दाखवितात. हे वागणे धोकेबाजी प्रकारात मोडते. आम्ही स्वतः खुप म हान किंवा ताकदवान आहोत असे समजून आम्ही दुसऱ्यांशी धोकेबाजी करतो. आम्ही नाटक करतो. आमचा पाखंडीपणा अनेक स्वरूपाचा असतो. काही लोकांना एक रूप दाखवितो, दुसऱ्यांना वेगळेच! आम्ही आमच्या मुळ चेहऱ्यावर अनेक मुखवटे लावतो व इतरांची फसवणूक करतो.म स्लीम धर्मातील हदीसमध्ये सांगितले आहे, पाखंडी माणसात तीन गुण असतात. एक पाखंडी जे बोलतो ते खोटे असते. दुसरे - तो जो वायदा करतो त्यात धोकेबाजी असते आणि तिसरे - जेव्हा त्याच्यावर विश्वास टाकला जातो तेव्हा तो नेमका विश्वासघात करतो.शेवटी त्याचे नाटक व बनवेगिरी उघडी पडते. सत्याला फार काळपर्यंत झाकून ठेवता येत नाही. धोकेबाजीची शिक्षा कठीण असते. खोटेपणा उघड झाल्यावर ज्यांचा आम्हाला पाठिंबा असतो ते आमच्या विरुद्ध होतात आणि मग आमचे तोंड लपविण्यासाठी कोठे जागा मिळत नाही. बहुतेक धर्मपरंपरात खोटे न बोलण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.बौद्ध धर्मात सांगितले आहे खोटे बोलणारा मनुष्य स्वतःशी खोटे बोलतो व देवतांशी सुद्धा खोटे बोलतो. देवतांशी खोटेपणा हा सर्व पापांचे मूळ आहे. त्यामुळे भयानक लोकांत पुनर्जन्म मिळतो. त्यामुळे पवित्र नियमांचा भंग होतो व शरीर दुषित होते (महारत्नाकूट सूत्र २७ - बोधिसत्व उपदेश) बायबलच्या जुन्या करारात आले आहे, जो कोणी वाईटाला चांगले, चांगल्याला वाईट, प्रकाशाला अंधार वा अंधाराला प्रकाश ठरवील, किंवा गोड वस्तुला कडू किंवा कडूला गोड म्हणेल त्याचा धिक्कार असो.(यशायाह ५-२०) कुराणात म्हटले आहे, जो कोणी स्वतः चूक करतो वा गुन्हा करतो त्याऐवजी दुसऱ्याला दोषी ठरवितो तेव्हा त्या पापांचा बोजा स्वतःच्या शिरावर घेतो व फार

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय : आणि त्यांच्या आईवडिलांनी त्यांच्यासाठी केलेल्या चांगल्या गोष्टींचं काय?

शिवानीदीदी : आईवडील आपल्यासाठी खूप काही करतात पण आपण कोणत्या गोष्टी लक्षात ठेवतो?सुरेश ओबेरॉय : आपण जास्त करून दुखावलं गेल्याचे प्रसंग लक्षात ठेवतो.

स्वतःला सांगायला हवं की, जरी माझ्या पालकांनी मला नीट वागणूक दिली नसली तरी त्यांचा त्यामागचा हेतू वाईट नव्हता... त्यांनी मला हेतुपुरस्सर इजा केली नाही... त्या वेळी मी दुखावले गेले कारण मला अनेक गोष्टी कळत नव्हत्या पण आज कळतात. अशा प्रकारे स्वतःशी बोलून मी म झ्या जखमा बऱ्या करू शकते.सुरेश ओबेरॉय : जर पालकांचा हेतू चांगला होता तर मग त्यांनी बाळावर टीका का केली आणि त्याला का दुखावलं?

शिवानीदीदी: कधीकधी, इतरांनी आपल्यासाठी काय काय केलं त्याबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त करतो आणि त्यांचं आपल्याला कौतुकही असतं, पण जर त्यांनीच कधी भूतकाळात आपल्यावर टीका केली असेल किंवा आपल्याला दुखावलं असेल तर अशा कटू आठवणींवर आपण मात केलेली नसते. असं म्हणू या, तुम्ही मला खूप भेटवस्तू दिल्या. त्या बाबत मी तुमची ऋणी आहे. पण एकदा कधीतरी तुम्ही मला खूप जोरात मारलं आणि मला जखम झाली. मी त्यातून बाहेर आले नाही आणि त्यासाठी मला कोणी मदतही केली नाही. ती जखम कधीच भरून आली नाही. मी तुम्हाला दिलेल्या भेटवस्तू तुम्ही लक्षात का ठेवत नाही? असं तुम्ही मला म्हणू शकता. त्या भेटवस्तू अजूनही माझ्याकडे आहेत पण ती जखम अजूनही वेदना देतीय, हेच सत्य आहे.सुरेश ओबेरॉय : कधीकधी भेटवस्तूही आपण गृहीत धरतो.शिवानीदीदी : असं नसेल तरीसुद्धा, भूतकाळातील जखमा जोवर भरत नाहीत तोवर त्या वेदना देत राहतात.अनेक वडीलधारी माणसं भूतकाळात अडकलेली आहेत. काळाप्रमाणे त्यांचं शरीर परिपक्व झालं आहे पण त्यांच्यातला आत्मा लहान मूल असताना होता तसाच आहे. बालपणातील किंवा भूतकाळातील जखमा ह्या फक्त शरीररूपी

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा - बाबा, मी पास झालो तर काय द्याल?

बाबा - ५०० रुपये.

मुलगा - मग १००० द्या, मी दोन विषयात पास झालोय!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संगणकाच्या कोणत्या भागास त्याचा मेंदू म्हणतात?

- सीपीयू

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४८८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

उरलेला २५ टक्के दोष मात्र स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये असण्याची शक्यता असते. म्हणूनच आपल्या ज्या भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला माता, जननी, लक्ष्मी म्हणून गौरविले जाते, त्याच देशामध्ये मूल न झाल्याने तिला 'वांझ' म्हणून अपमानित केले जाते. आपले स्वतःचे हक्काचे 'भारतीय संस्कृतीमध्ये उगम पावलेले आयुर्वेदशास्त्र व आधुनिक वैद्यकशास्त्र यांचा मेळ घालून संयुक्त उपचार पद्धतीने अपत्यप्राप्तीचे सुख मिळविता येते.वंध्यत्व व्याख्या :लग्नास एक वर्ष पूर्ण होऊनही किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी जाऊनही नियमितपणे साधारणतः आठवड्यातून तीन वेळा शारीरिक संबंध ठेऊनही जर गर्भधारणा होत नसेल, तर अशा अवस्थेला 'वंध्यत्व' असे म्हणतात.

गर्भधारणा प्रक्रिया :स्त्रियांमध्ये रजःस्राव ही अवस्था म्हणजेच पाळी ही वयाच्या तेराव्या वर्षापासून ते पंचेचाळीस वर्षांपर्यंत येते. साधारणतः या काळात गर्भधारणा होत असते. मासिक पाळीच्या बाराव्या दिवसापासून ते अठराव्या दिवसापर्यंत स्त्रीबीज तयार होऊन परिपक्व होते व फुटते. स्त्रीच्या या काळात पती व पत्नीमध्ये प्रेमभावनेने शारीरिक संबंध होऊन स्त्रीच्या योनीमार्गात वीर्य पडते. वीर्यामधील काही शुक्रजंतू गर्भाशयात जाऊन बीजवाहिनी नलिकेपर्यंत पोहोचतात. त्यातील एक वटीव्ह शुक्रजंतूचा स्त्रीबीजाशी संयोग होतो. त्यालाच फलन असे म्हणतात. त्यातून पेशीसमूह तयार होतो. हा पेशीसमूह गर्भाशयाच्या अस्तरामध्ये रुजतो आणि गर्भधारणा होते. या अशा गर्भधारणेच्या प्रक्रियेमध्ये अडचण आल्यास गर्भधारणा होत नाही.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार या संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे विद्यमान चेअरमन डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

# महेश नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार या संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वा. सीताबन लॉन येथे विद्यमान चेअरमन डॉ. अशोक चंगेडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेच्या सुरुवातीला बऱ्याच सभासदांनी सहकार प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणासाठी सहकार खात्याचे प्रा. साखरे यांनी सभासदांना सविस्तर माहिती दिली.

प्रमुख पाहुणे म्हणुन भिंगार अर्बन बॅंकेचे चेअरमन अनिल झोडगे व मर्चंट बॅंकेचे चेअरमन संजय चोपडा, डॉ. अशोक चंगेडे, व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत व संचालक व व्यवस्थापक यांच्या उपस्थितीत महेश प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करण्यात आले व नंतर डॉ. अशोक चंगेडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करुन सत्कार केला.

अशोक चंगेडे यांनी मनोगत व्यक्त करतांना मागील १२ वर्षानंतर प्रथमच पतसंस्थेला 'अ' ऑडिट वर्ग मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच पतसंस्थेला सर्व तरतुदी करुन निव्वळ नफा रु.९६ लाख झालेला असुन सदर नफ्यात २७ % ने वाढ झालेली आहे. पतसंस्थेचे एकुण कर्ज वाटप २८.८३ कोटी असुन सदर कर्जात ४४.३८ टक्क्याने वाढ झालेली आहे. एवढे कर्ज वाटप करुनही चालु वर्षी संस्थेने थकीत कर्ज वसुल देखील चांगली करुन निव्वळ एन.पी.ए. ०.००% ठेवलेले आहे. पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी ठेवुन भिंगार येथील महेश चिल्ड्रन पार्क मधील नादुरुस्त खेळणी बसवुन दिली. तसेच मकर संक्रांतीला महिला संचालकांनी हळदीकुंकवाचे कार्यक्रम केले त्यात बऱ्याच महिला सभासदांनी भाग घेतला होता.

पतसंस्थेच्या स्थापनेपासुन प्रथमच वार्षिक सर्वसाधारणा सभा भिंगार सोडुन अहिल्यानगर येथे झाली. सभेमध्ये रामकृष्ण पतसंस्थेचे चेअरमन किसनलाल बंग व संचालक लक्ष्मीकांत झंवर, ओसवाल बडी साजन संस्थेचे चेअरमन राजेंद्र ताथेड, भिंगार अर्बन बॅंकेचे चेअरमन अनिल झोडगे, व्यवस्थापक शशिकांत महाजन, संचालक आर. डी. मंत्री, रुपेश भंडारी तसेच अनिल दुग्गड, भुषण भंडारी, सतिष गुंदेचा, जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन संतोष गांधी, समिर बोरा, शैलेश गांधी, शहर बॅंकेचे संचालक अशोक कानडे, माणिक विधाते, व्यापारी, सभासद उपस्थित होते.

पतसंस्थेचे प्र. व्यवस्थापक राजेंद्र मेहेर यांनी सभेपुढे विषयपत्रिकेप्रमाणे प्रत्येक विषय वाचुन आलेल्या सभासदांकडुन एकमताने सर्वच्या सर्व विषय मंजुर करुन घेतले.

लक्ष्मीकांत झंवर यांनी मनोगत व्यक्त करतांना संस्थेने मिळालेला नफा, तसेच एन.पी.ए. शुन्य टक्के असल्यामुळे व रिझर्व्ह फंड देखील मोठ्या प्रमाणात असल्याने संस्थेत ठेवी मोठ्या प्रमाणात येथील मी स्वतः देखील पतसंस्थेला माझ्या वैयक्तिक ठेवी संस्थेत ठेवणार आहे असे आश्वासन दिले.

शशिकांत महाजन यांनी देखील भाषणात पतसंस्थेच्या अहवालाबद्दल कौतुक केले. पतसंस्था लवकरच उच्चांक गाठेल याबद्दल शंका नसल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन पतसंस्थेचे संचालक संजय सपकाळ यांनी केले. व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत यांनी आभार प्रदर्शन करुन राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली. नंतर आलेल्या सभासदांसाठी भोजनाची व्यवस्था केली होती.

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये पतसंस्थेचे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत, संचालक प्रकाशलाल चोरडिया, संजय सपकाळ, कांतीलाल बोरा, विनोद भंडारी, नितीन शिंगवी, सुशील भंडारी, पवन गुंदेचा, संजय मुनोत, सुदाम गांधले, मारुती पवार, किरण पतके, संचालिका सौ. वैशाली बोरा, सौ. अंजली शिंगवी, डॉ. श्रीकांत गांधी व व्यवस्थापक राजेंद्र मेहेर, कर्मचारी, आजी माजी संचालक व सभासद उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## उपकाराच्या फेडीची अपेक्षा नसावी







बा माणसा, कुणी तर संकटात सापडला, तू त्याच्या मदतीला गेलास. तो संकटातून निभावला. तू त्याच्यावर हा उपकारच केलास. आता काय तू अपेक्षा करायची की त्याने उपकाराची फेड करावी? म्हणजे तुझ्यावरही संकटे यावीत, त्याला ती संकटे दूर करण्याची संधी द्यावी आणि मग तू उपकाराची फेड झाल्याची पावती द्यावी? हा केवढा मूर्खपणा. पण लोक मात्र म्हणतातच की उपकाराची फेड प्रत्युत्तराने करावी. म्हणजे उपकारकर्त्यावर त्यासाठी आधी संकटे यावीत ? उपकारकर्त्याने प्रत्युत्तराची इच्छा करू नये. उलट कुणी उपकार फेडण्याची गोष्ट करतील. तर साफ अडवावे.

वाल्मिकी रायामणात प्रभू रामचंद्र हनुमंताला म्हणाले, हे वानरश्रेष्ठा, तू केलेस उपकार, पण मी फक्त कृतज्ञता व्यक्त करणार. माझ्यावर रावणाने संकट आणले. माझ्या प्रियतम सीतेला पळवून नेले. माझ्यावर विरहाचे डोंगर कोसळले. तू प्राण संकटात घालून माझ्या सीतेला शोधलेस. तू विरहाचे माझे दुःख संपविलेस, पण हे उपकाराचे ओझे असेच माझ्या शिरी राहू दे. मी ते फेडण्याची कल्पनाही मनात आणत नाही. अरे, तुझे उपकार फेडायचे, म्हणजे तुझ्यावरही आधी माझ्यासारखे विरहाचे दुःख यावे, असेच ना मी इच्छायचे? ही कृतज्ञता की कृतघ्नता ?

म्हणून, उपकार निरपेक्ष भावनेने करावा. संत तुकाराम महाराज म्हणतात, पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाही जोडा दुजायासी।

दुसऱ्याला संकटातून सोडविणे, त्या दुबळ्याचे दुःख दूर करणे, ही सगळी पुण्याईची उपकरणे. हेच उपकार म्हणणे. त्यामुळे स्वतः ला सुख लाभणे. समाधानाची रास रचणे. पण म्हणून या उपकाराची परतफेड अपेक्षिणे? ज्या दीनदुबळ्याला तू वाचवलेस, त्याच्यात क्षमता नसतानाही त्याला उपकाराची फेड करायला लावणे? हे तर त्याला दुःखच देणे. असमर्थतेमुळे त्याची त्याला पीडा होणे. असे दुसऱ्याला कष्ट देणे हे तर पाप. त्याला जगात जोड नाही.एका तळ्यात एक मुंगी पडली. प्राण वाचवायला तडफडत होती. ते झाडावरच्या कबुतराने पाहिले. झाडाचे पान खुडून टाकले. मुंगी त्या पानावर चढली. सुखरूप किनाऱ्याला लागली. कबुतर म्हणाले, मी केलेले उपकार विसरु नकोस. मुंगीही मनात म्हणाली, कबुतराच्या उपकाराची फेड केलीच पाहिजे. पण तिला संधीच मिळेना. कबुतरावर संकटच येईना. काय करावे ते मुंगीला सुचेना. उपकार फेडल्याविना चैन पडेना. मग ती गेली पारध्याकडे म्हणाली, कबुतराला बाण मार. संकटात टाक. पारध्याने बाण मारला. तेवढ्यात मुंगीने त्या पारध्याला चावा घेतला. पारध्याचा नेम हुकला. पण कबुतराला जखमी करून गेला. कबुतर जायबंदी झाले. मुंगी म्हणाली, मी पारध्याला चावा घेऊन तुझे प्राण वाचवले. उपकार फेडले.

– **किशोर गांधी**

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## सभासदांना ५५१ रूपयांची मुदत ठेव पावती व १५ टक्के लाभांश देणार : अभय पितळे



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात झाली.

नगर – सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन अभय पितळे यांच्या अध्यक्षतेखाली केशर गुलाब मंगल कार्यालयात पार पडली. सभासदांचा विश्वास आणि उत्कृष्ट आर्थिक कारभारातून संस्थेने रौप्य महोत्सवी वर्षाचा टप्पा ओलांडला आहे. यानिमित्त सभासदांना प्रत्येकी ५५१ रूपयांची मुदत ठेव पावती व १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय वार्षिक सभेत घेण्यात आला. शासनाच्या सहकार विभाग उपनिबंधक कार्यालयाची मंजुरी मिळाल्यानंतर ठेव पावतींचे वितरण करण्यात येईल.

चेअरमन अभय पितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेस व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, समीर बोरा, चेतन भंडारी, ॲड.आनंद फिरोदिया, शरद गोयल, तेजस्विनी बोगावत, श्रीकांत भागवत, अमित भांड, तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे, सीए डॉ. परेश बोरा, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी आदींसह सभासद जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, ज्येष्ठ सभासद राजेंद्र चोपडा, शैलेश मुनोत, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी, ॲड. प्रदीप भंडारी, ॲड. मनिष गांधी, ॲड. अतुल गुगळे, अनिल पितळे, उमेश गिल्डा, डॉ. विजय भंडारी, ॲड. विजय लुणे, अभय गुगळे (नेवासा), सागर गांधी (नेवासा), सागर बोरा, प्रविण गांधी, जॉईजचे अध्यक्ष सुजीत गुगळे, जवाहरलाल कटारिया, संदीप गांधी, प्रशांत गांधी, प्रकाश गांधी, उर्मिला पितळे, पुष्पा चानोदिया, लता बोरा, अभिनेत्री चंगेडिया, नयना बोगावत, संजय भळगट (सोनई) आदींसह सभासद उपस्थित होते. महिला सभासदांची उपस्थितीही लक्षणीय होती.

प्रारंभी सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांनी सभेच्या नोटिसीचे वाचन केले.

अध्यक्षीय मनोगतात चेअरमन अभय पितळे म्हणाले की, आदरणीय सुवालालजी गुंदेचा यांनी संस्थेच्या रुपाने लावलेले रोपटे आज खूप बहरले आहे. त्यांच्याच आदर्शांनुसार संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू आहे. सभासद, ग्राहकांचा पतसंस्थेवरील अतुट विश्वास, संचालक मंडळाचे सहकार्य आणि कर्मचाऱ्यांची संस्थेवरील अढळ निष्ठा या तीन मजबुत खांबावर उल्लेखनीय प्रगती साध्य केली आहे.

संस्थेचा २५ वर्षाचा रौप्य महोत्सवी यशस्वी प्रवास सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून यशस्वी झाला आहे. तीव्र स्पर्धेच्या काळात पतसंस्थेने समर्थपणे प्रगती साधली आहे. गत आर्थिक वर्षाखेरीस संस्थेने एकुण रु. ६०५.९२ कोटीचा व्यवसाय केला आहे. पतसंस्थेच्या ठेवी मध्ये १३.६६ टक्केने वाढ झालेली असुन कर्जामध्ये ६.७४ टक्के वाढ झालेली आहे. यामुळे पतसंस्थेस सीडी रेशोचे योग्य प्रमाण राखण्यात यश मिळाले आहे. आजमितीस संस्थेकडे १०१ कोटी ८२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. एकूण कर्ज वितरण ८३ कोटी ७३ लाख रुपये आहे. राखीव व इतरनिधी ५ कोटी २७ लाख ६६ हजार रुपये असुन वसुल भागभांडवल २ कोटी ६८ लाख रुपये आहे. संस्थेने एकूण २९ कोटी ५९ लाख रुपयांची गुंतवणुक वेगवेगळ्या बॅंकेत केलेली आहे. संस्था सर्वात कमी व्याजदराने म्हणजे फक्त ९ टक्के दराने सोनेतारण कर्ज उपलब्ध करुन देते, प्रति १० ग्रॅम सोन्यावर १ लाखापर्यंत कर्ज उपलब्ध आहे. अहवाल वर्षात पतसंस्थेस शासकीय लेखापरिक्षण वर्ग 'अ' दर्जा प्राप्त झालेला असुन पतसंस्थेचे या वर्षांचे लेखापरिक्षण पंडित रामचंद्र आरणे यांनी केले आहे. पतसंस्थेने सर्व सभासदांची माहिती अद्ययावत करण्यासाठी विविध माध्यमातुन प्रयत्न केले. आज पर्यंत ७० टक्के सभासदाची माहिती अदयावत करण्यात आली आहे. पुढील वर्षापासुन आपणांस अहवाल हा डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन पाठविण्यात येईल. संस्थेला नाशिक विभागातील नागरी ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्थांचे पतसंस्था फेडरेशन व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांचे मार्फत उत्कृष्ट कामकाजाबद्दल व १०० कोटी ठेवींचा टप्पा तसेच संस्थेत लाभलेले युवा नेतृत्व यासाठी पुरस्कार प्राप्त झाला आहे. पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना ५५१ रुपयांची मुदतठेव पावती भेट म्हणुन दिली जाईल. सहकार विभागाची आवश्यक परवानगी मिळाल्यानंतर ठेव पावती वितरण केले जाईल. सर्व सहकारी संचालक, कर्तव्य तत्पर अधिकारी, कर्मचारी पतसंस्थेच्या प्रगतीत योगदान देत असतात. परंपरेनुसार यावर्षीही सभासदांना १५ टक्के लाभांश दिला जाणार आहे.

समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक हस्तीमल मुनोत यांना जैन कॉन्फरन्सचा राष्ट्रीय सन्मान मिळाल्याबद्दल, ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांना हमसफर या शॉर्ट फिल्मसाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल, सीए आयपी अजय मुथा यांची आयसीएआय नवी दिल्ली येथील डायरेक्ट टॅक्स कमिटीवर सदस्यपदी निवड झाल्याबद्दल, दिशान किशोर गांधी याने कॉर्फबॉल खेळाच्या विश्वचषक स्पर्धेत भारताकडून खेळताना उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल या सर्वांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना पतसंस्थेच्या वतीने समाधानकारक उत्तरे देण्यात आली. विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना चर्चेअंती सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. मनोज लुणिया यांनी सूत्रसंचालन केले. व्हाईस चेअरमन शैलेश गांधी यांनी आभार मानले.

# जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, नगरच्या अध्यक्षपदी गोरक्ष शेळके, महिला अध्यक्षपदी सीमा मडके





नगर – जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या नूतन कार्यकारिणीची निवड झाली. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, शाखा अहिल्यानगरची नूतन व विस्तारित कार्यकारिणी निवड म्हात्रे सभागृहात २६ सप्टेंबर रोजी करण्यात आली. 'एकजुटीने काम करू... आरोग्यदायी समाज घडवू' या ध्येयाने संघटना जिल्ह्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी काम करणार आहे. संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बाळाजी तोडमाल, संभाजी आल्हाड, विलास शेळके, बाळासाहेब फटांगरे आणि नारायण बोराडे, राज्य पातळीवर किरण खेसमाळसकर, मनोहर डिसले आणि ज्योती पवार संघटनेचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी गोरक्ष शेळके, महिला अध्यक्षपदी सीमा मडके, कार्याध्यक्षपदी सोपान शेटे, पराग चिंतबर, सुरेखा पालवे आणि जोतिबाला सोनार, सरचिटणीसपदी रमेश जावळे, मनिषा जाधव, सचिवपदी निलेश गाडेकर, मीनाक्षी मुळे, तर कोषाध्यक्षपदी संतोष पालवे, ज्योती तोडमल यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी जालिंदर खाडे, रविंद्र काळे, स्वाती चौधरी, जयश्री फटांगरे आणि योगेश तिकोणे, सहसचिवपदी समीर कुलकर्णी, विक्रम ससे, तान्हाजी गडाख आणि स्वाती चौधरी यांची निवड झाली.

तालुका अध्यक्ष म्हणून नगर–कल्याणी हेम्बाडे, पाथर्डी – प्रशांत नरवडे, नेवासा – शिवाजी जवणे, राहता – दिपक एकबोटे, श्रीरामपूर – अनिकेत कंदारे, संगमनेर – अरविंद काळे, श्रीगोंदा – प्रदीप गाढवे, कोपरगाव – राहुल साळवे, शेवगाव – आदित्य दगडखेर आणि राहुरी – किरण दळवी यांची निवड झाली. संघटक म्हणून संदीप साळवे, दत्ता शिंदे, नागेश आल्हाट, कैलास गुंजकर, निलेश राजापूरे, वीरेंद्र वाघचौरे, ललिता कासुळे, नंदा शिंदे व विशाल खंडागळे, तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून मिलिंद कांबळे व योगेश सुतार काम पाहणार आहेत.



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शरद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

# सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

नगर – सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शरद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

सर्वप्रथम दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सभेची सुरुवात करण्यात आली. प्रथम कार्यवाहक ज्योती केसकर यांनी मागील २०२५ –२६च्या कामकाजाच्या अहवालाचे वाचन केले. तर सभेपुढील विषयाचे वाचन मोरेश्वर मुळे यांनी केले.

मंचच्या आर्थिक व्यवहार व इतर कार्यासंबंधी श्रीधर बापट व यशवंत बागडे यांनी या संदर्भात प्रश्न विचारले. सभासदांच्या प्रश्नांचे व शंकांचे समाधान मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी केले व त्यांच्या सूचनांची दखल घेण्यात आली. वार्षिक अंदाजपत्रकाचे वाचन कोषाध्यक्ष बाजीराव जाधव यांनी केले.

अहवाल, अंदाजपत्रक व मागील वर्षाचे आर्थिक पत्रके आदींना यावेळी सभेने एकमताने मंजुरी दिली.

यानंतर सभासदांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. श्रीकांत नाईक, सर्वोत्तम क्षीरसागर, खणकर सर, किशोर साळवे, श्री. ढेपे, कैलास बेरड, कृष्णराव बागडे, शरद देशमुख, यशवंत वराडे सभेस सर्व कार्यकारणी व सभासद उपस्थित होते. अल्पोपहार व चहापान देऊन सभेची सांगता झाली.

# छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## १२ कोटींचे लाभ सभासदांच्या खात्यावर वर्ग; २५० गुणवंत विद्यार्थ्यांचा व सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा गौरव



छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेच्या सभेची सुरुवात गणेश पूजनाने करण्यात आली.

नगर – छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर या संस्थेची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच निशा लॉन, केडगाव, अहिल्यानगर येथे उत्साहात झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन संतोष साबळे होते. यावेळी सुमारे ८०० सभासद सभेस उपस्थित होते.

सभेच्या निमित्ताने महापौर सौ. ज्योती अमोल गाडे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके आणि महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर, चेअरमन संतोष साबळे यांच्या हस्ते २५० गुणवंत विद्यार्थ्यांचा, त्यांच्या पालकांचा तसेच सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.

१२ कोटींचे लाभ सभासदांच्या खात्यावर वर्ग : संतोष साबळे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर करताना सांगितले की, संस्थेचे एकूण १,३२५ सभासद असून, वसूल भागभांडवल १४ कोटी रुपये आहे. संस्थेकडे ३८ कोटी रुपयांचे फंड, २०५ कोटी रुपयांच्या ठेवी, तर सभासदांना एकूण २३४ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. संस्थेची एकूण गुंतवणूक १८ कोटी रुपये असून, स्थावर मालमत्ता १ कोटी ५ लाख रुपयांची आहे. संस्थेने सर्व तरतुदी वजा जाता ३१ मार्च २०२६ अखेर १५० लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे.

संस्थेचे व्हाईस चेअरमन सुधीर उंडे यांनी संस्थेच्या आर्थिक स्थितीची माहिती दिली.

मानद सचिव गोटीराम मडके यांनी सभासदांना लाभांश, कायमठेव व्याज व व्याज परतावा (व्याज रिबेट) या स्वरूपात एकूण १२ कोटी रुपये सभासदांच्या बॅंक खात्यावर वर्ग करण्यात आल्याची माहिती दिली.

यावेळी संतोष साबळे, सुधीर उंडे, मानद सचिव गोटीराम मडके तसेच माजी चेअरमन तथा संचालक प्रताप साबळे, हरीश भालेराव, ज्ञानेश्वर सुर्वे, सदानंद डोखे, सुधाकर पगारे, श्रीकांत साळे, रवि देशमुख, प्रशांत सातपुते, नवनाथ गोरे, ज्ञानदेव अडसुरे, किशोर जेजुरकर, संतोष खंडागळे, श्रीमती संगीता परोडकर, श्रीमती सुरेखा लांडगे, श्रीमती अर्चना गुंड, प्रविण इल्हे, राजेंद्र ढाळे, ज्ञानदेव शिंदे उपस्थित होते.

पतसंस्थेच्या वार्षिक सभेनंतर महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघ, जिल्हा शाखा अहिल्यानगर या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा जिल्हाध्यक्ष किशोर सुगंधा किसनराव जेजुरकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

यावेळी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष कुंडलिकराव भगत यांचा सेवानिवृत्त झाल्याने सन्मान करण्यात आला. यावेळी पोपटराव रासकर, प्रमोद कानडे, कैलास तरटे, सुनील काळे, श्रीमती वैशाली बोरुडे, श्रीमती सीमा नजन, श्रीमती संगीता डावरे, उपेंद्र पोटे, देवेंद्र वारुळे, राहुल गांगई, श्रीमती अश्विनी व्यवहारे, श्रीमती मनीषा तोडमल, श्रीमती वैशाली सानप, अनिल लवांडे, संदीप रोटे, सुभाष कापसे, राजेंद्र कंदलकर, अमित कोल्हे, रमेश सुपेकर, हितेश दुमणे, मधुकर पगारे, लहान थिने, राजू दराडे, बाजीराव पवार, भाऊसाहेब पालवे, प्रशांत कदम, विनायक घानमोडे, सतीश राठोड, आनंद कांडेकर, चंद्रकांत खाडे, मनोज बनकर, दादासाहेब डोले, संजय घोलप, संजय नेव्हल, कुमार गणणे, कारभारी जाधव, धर्मराज गायकवाड, श्रीमती स्वाती पटेकर, श्रीमती संगीता कदम, श्रीमती कविता दांगट, अमृत शेवाळे, दादासाहेब रोळके, सुरेश खरड, दत्तात्रय वाळके, संजय भिंगारदे, प्रशांत दर्शन, अभिजीत पिंपळे, अविनाश म्हस्के, निलेश माने, बाळासाहेब अडसुळ, विलास शेळके, दिगंबर काटे, ताराचंद गाडे, प्रेमचंद वाघमारे, भारत देशमुख, श्रीमती सपना कांबळे, श्रीमती ललिता बौद्रे, श्रीमती अनिता माळी, श्रीमती दिपाली घनवट, श्रीमती स्वप्निल आंबेटकर, संदीप थोरात, रविंद्र पवार, श्रीमती अर्चना कडू, श्रीमती सुरेखा देशमुख, भाऊसाहेब भांड, राजेंद्र बागले, तुळसीराम दिनकर, प्रभाकर चव्हाण, प्रदीप आसने, प्रशांत बरबडे, प्रमोद म्हस्के, बबनराव बहिर, रोहिदास कापरे, साहेबराव घोरपडे, विशाल झावरे, अशोक जगदाळे, तुकाराम भांगे, सखाहरी थोरात, संदीप शिंदे, बाबासाहेब भोसले, राजू भालदंड, अनुसुयाकुमार उन्हाळे, राजेंद्र आहेर, अमोल भवर, रफिक ताबळी, शिवाजी धांडे, दास तिपोळे, सचिन थोरात व पोपटराव गावडे यांच्यासह जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी बंधू–भगिनी उपस्थित होते.

तसेच उपस्थित सभासदांना प्रत्येकी १,००० रुपये उपस्थिती भत्ता देण्यात आला.

संस्थेची आर्थिक प्रगती, सभासदांना मिळणारे आर्थिक लाभ, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यानगरमध्ये शालेय रायफल शुटिंगचा थरार

**खेळाडूंचा सहभाग; अचूक नेमबाजीने खेळाडूंनी गाजवला मैदान; पदक विजेत्या नेमबाजांचा गौरव**

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर महानगरपालिका आणि अहिल्यानगर शूटिंग स्पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय मनपा रायफल शूटिंग स्पर्धा २०२६–२७ उत्साहात पार पडली. भिंगार येथील इन्फिनिटी स्पोर्ट शूटिंग क्लब येथे झालेल्या या स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील तब्बल ७४ शालेय खेळाडूंनी सहभाग नोंदवत आपल्या नेमबाजी कौशल्याचे दर्शन घडविले.


शालेय जिल्हास्तरीय मनपा रायफल शूटिंग स्पर्धा २०२६–२७ मध्ये सहभागी झालेले खेळाडू.

स्पर्धेचे उद्घाटन पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते झाले. विविध गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी अचूक नेम साधत उत्कृष्ट कामगिरी केली. पदक विजेत्या खेळाडूंचा गौरव अहिल्यानगरचे अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्या हस्ते मेडल व ट्रॉफी देऊन करण्यात आला.

स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून पदके मिळविणाऱ्या खेळाडूंचा मेडल व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सी.ए. ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे, माजी नगरसेविका मनीषा काळे, प्रवीण धायतडक (सेल्फ केअर फाउंडेशन), लेफ्टनंट कर्नल ध्रुव नासीर, उद्योजक हरीश नय्यर, प्रियदर्शनी पब्लिक स्कूलच्या प्राचार्य अंजली बोधक, बाळासाहेब खोमणे, संजय साठे आणि घनश्याम सानप उपस्थित होते.

या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, वरिष्ठ कक्ष अधिकारी लाड, सोल मॅडम, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडारे, संतोष वाबळे, कोमल वाकळे, व्हिन्सेंट फिलिप्स तसेच पालकांनी शुभेच्छा दिल्या. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली.

शालेय जिल्हास्तरीय मनपा रायफल शूटिंग स्पर्धा २०२६–२७ मधील विजेते पुढीलप्रमाणे :– एअर पीप साइड रायफल प्रकारात मुलांच्या १४ वर्षे वयोगटात पृथ्वीराज देशमुख व आयुष राऊत, १७ वर्षे वयोगटात चैतन्य गंधडे, साईराज बागुल व पार्थ वाणी, तर १९ वर्षे वयोगटात शिवेंद्र नेमणे व आयुष कोहोक यांनी पदक मिळवले.

मुलींच्या १४ वर्षे वयोगटात कार्तिकी कोकाटे व श्रुती बडेकर, १७ वर्षे वयोगटात पंकजा आटोळे, मुग्धा राजापूरे व मानसी वाबळे, तर १९ वर्षे वयोगटात किर्ती चक्रवर्ती, राजनंदिनी काळे व राजलक्ष्मी घडेकर यांनी पदक पटकावले.

एअर पिस्तूल प्रकारातील मुलांच्या १४ वर्षे वयोगटात आयुष इंगळे व शिवाश धामणे, १७ वर्षे वयोगटात अद्वय धायतडक, युवराज ठाणगे व प्रेम वाणी, तर १९ वर्षे वयोगटात तन्मय वाघ, आदित्य बुचुडे व समर कुसमुडे यांनी पदक मिळवले.

मुलींच्या १४ वर्षे वयोगटात ज्ञानेश्री बागल, १७ वर्षे वयोगटात वेणुश्री मंगलारप व नक्षत्रा धामणे, तर १९ वर्षे वयोगटात श्रावणी भगत, सिद्धी खुरंगे व अनुष्का जाधव यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

ओपन साइड एअर रायफल प्रकारात मुलांच्या १४ वर्षे वयोगटात शंभूराज कोरेकर, आयुष शिंदे व श्लोक दळवी, १७ वर्षे वयोगटात वरुण कोल्हे, श्रवण राऊत व प्रथमेश गदादे, तर १९ वर्षे वयोगटात ओमकार मांडे, अभिज्ञान काळे व वेदांत होळकर यांनी पदके मिळवली. मुलींच्या गटात १४ वर्षे वयोगटात गायत्री शिर्के, तर १७ वर्षे वयोगटात आदिती अलचेट्टी हिने पदक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.


विविध क्रीडा स्पर्धेच्या विभागासाठी निवड झालेले गुरुकुल कॅम्पस मधील विद्यार्थी.

# ‘गुरुकुल कॅम्पस’ मधील विद्यार्थ्यांची विविध क्रीडा स्पर्धेच्या विभागासाठी निवड

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२६–२७ मध्ये गुरुकुल कॅम्पस मधील एकता एज्युकेशन अ‍ॅण्ड वेलफेअर सोसायटी संचलित डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शालेय क्रीडा स्पर्धेची निवड चाचणीत यशस्विरित्या यश संपादन करून त्यांची विभागस्तरासाठी निवड झाली.

या क्रीडा स्पर्धेमध्ये निवड झालेले गुरुकुल इंग्लिश मीडियमचे विद्यार्थी : पठाण अर्शिया मतिन – ज्युडो प्रथम क्रमांक, तायक्वोदो द्वितीय क्रमांक, उशो मध्ये द्वितीय.

शेकडे सई संजय हिने ज्युडो प्रथम क्रमांक, उशो मध्ये द्वितीय, तायक्वांदो तृतीय तसेच गायकवाड सिद्धी प्रदीप व गायकवाड उदय संदिप ह्यांनी कुस्ती विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

बॉक्सींग विभागात शेख आयशा आयुब ही प्रथम क्रमांक पटकावला.

डॉ. पी. ए. इनामदार माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी धोत्रे हरिदास नारायण याने तायक्वांदो स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

या प्रसंगी विद्यार्थीना मिळविलेल्या यशाबद्दल व विभागसाठी निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष एन.ए पठाण, शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, सचिव समीर पठाण, शाला समिती सदस्य लक्ष्मीकांत गरड, देविदास डहाळे, विद्यालयाच्या शिल्पा शिंदे, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या दीप्ती कराळे, मार्गदर्शन शिक्षक अभिजीत गवारे, फातिमा शेख, शीतल राहणे आदींनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.


१४ वर्ष खालील मुले फुटबॉल संघ राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना झाला.

# १४ वर्षाखालील मुलांचा फुटबॉल संघ राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना

नगर – २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान केंद्रीय विद्यालय संघटन यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धा २०२६ देहरादून येथे होणार असून सदर स्पर्धांसाठी एम. श्री केंद्रीय विद्यालय नंबर ३. व्ही आर डी इ, अहिल्यानगर या १४ वर्ष मुले यांनी रिजनल स्पर्धांमध्ये सुवर्णपदक पटकावून मुंबई विभागातून आपले स्थान राष्ट्रीय स्पर्धांमध्ये निश्चित केले आहे.

सदर स्पर्धांसाठी २६ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय स्पर्धांसाठी रवाना झाला असून १४ खेळाडूंचा सदर संघात खालील खेळाडूंचा समावेश आहे. वैभव पाचारणे, तरंग पटेल, क्षितिज बोठे, आरव शिंदे, विराट उर्मुडे, प्रणित सोरटी, हर्षल पवार, आरुष नेमणे, अंश निमसे, अर्णव सातपुते, आदित्य मोरे, अजिंक्यराज अहिरे, आशिष म्हस्के, आयुष नेमणे हे खेळाडू असून संघ व्यवस्थापक उदय भानू गुप्ता व प्रशिक्षक अंजनी शर्मा यांचा समावेश आहे.

कामगिरीबद्दल शाळेचे प्राचार्य बी. ऐ लोंढे यांनी अभिनंदन केले तसेच वरील सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक सौ. सोनिया बिदान व शिक्षक वृंद यांचे मार्गदर्शन लाभले.

# एकलव्य अकॅडमीच्या २४ खेळाडूंची विभागीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड

नगर – महानगरपालिका शालेय तायक्कांदो स्पर्धा २६ व २७ वाडिया पार्क येथे पार पडल्या. यामध्ये संपूर्ण स्पर्धेवर एकलव्य तायक्कांदो अकॅडमी चा दबदबा होता. सुवर्णपदक २४, रोप्य पदक–११, कांस्यपदक–१६२४ खेळाडूंची विभागीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली.


महानगरपालिका शालेय तायक्कांदो स्पर्धा वाडिया पार्क येथे पार पडल्या. (छायाचित्र – अमित मन्यार)

सुवर्णपदकाचे मानकरी – अदिती धावड, वनश्री लष्करे, भावना लष्करे, श्रावणी जाधव, वैष्णवी लेहणे, पवन लेहणे, पियुष सहानी, नैतिक गडाख, हर्षदा हजारे, श्रेयस गायकवाड, श्रीनिवास शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, रोहन चव्हाण, आदित्य घिगे, श्रद्धा गायकवाड, धनश्री जपकर, आरती बांगर, सोहम काळे, देव सत्रे, श्रेयश पोटदुखे, गौरी दळवी, कार्तिकी कोतकर, तनुजा दळवी, रोशन शेख

रोप्य पदक विजेते खेळाडू पुढीलप्रमाणे – आदित्य जाधव, गोरक्ष भापकर, सुजय पाडळे, प्रांजल पोटे, दिव्यांश सहानी, हर्ष निकाळजे, तेजस तांबडे, कार्तिक थोरे, यशराज कांबळे, वेदिका कुऱ्हाडे, संचिता राहीज

तसेच कांस्य पदक विजेते खेळाडू – वेदांत पवळ, देवदत्त तांबे, समर्थ टकले, संदेश गायकवाड, विराज तांबडे, समर्थ गायकवाड, सूरज काळे, रितेश कोरडे, अवधूत गुंजाळ, चैतन्य गुंजाळ, तुषार कावळे, साई येणारे, संस्कृती कोळगे, अनुष्का रोडे, आरव मुनोत, समोर डेगिया

या खेळाडूंना एकलव्य तायक्कांदो अक्डेमीचे मुख्य प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचितकर, सचिन मरकड, मंगेश आहेर यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धा घनश्याम सानप यांच्या मार्गदर्शनात पार पडल्या.

याप्रसंगी महानगरपालिका क्रीडा विभाग प्रमुख विल्सन फिलिप्स सायकलिंग असोसिएशन चे संजय साठे, सर्व विजय खेळाडूंचे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओबासे, उपाध्यक्ष घनश्याम सानप, महासचिव गफार पठाण, कोषाध्यक्ष डॉक्टर प्रसाद कुलकर्णी, ताइक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष प्राध्यापक माणिकराव विधाते, सचिव गणेश वंजारे, खजिनदार धर्मनाथ घोरपडे

ग्रँडमास्टर अल्ताफ खान, एकलव्य तायक्कांदो अक्डेमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते, नगरसेवक विजय पठारे या सर्वांनी अभिनंदन केले. व पुढील विभागीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. निवड झालेले खेळाडूची विभागीय स्पर्धा ४ आणि ५ ऑक्टोबर ला न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी, तालुका आंबेगाव जिल्हा पुणे येथे होणार आहेत.

# हिंदी काव्य सादरीकरण स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

नगर – नगर महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने हिंदी भाषा प्रसार, प्रचार व संवर्धनासाठी समर्पित शंकर केशव आडकर चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने हिंदी पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर हिंदी काव्य सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला शालेय, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विषयांवरील कविता प्रभावी आवाज, आशयपूर्ण सादरीकरण आणि आत्मविश्वासाने सादर केल्या.


डॉ.शंकर केशव आडकर चॅरिटेबल ट्रस्ट व नगर कॉलेज हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमान हिंदी कविता सादरीकरण स्पर्धा झाली.

रायसोनी कॉलेजचे निवृत्त प्राचार्य डॉ. सुरेशकुमार जैन यांच्या हस्ते तसेच नगर महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग यांच्या अध्यक्षतेखाली व रजिस्ट्रार कल्पलता भिंगारदिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ झाला. उत्कृष्ट विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानपत्र व हिंदी साहित्य देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. सुरेशकुमार जैन म्हणाले की, मोबाईलमध्ये गर्क असलेल्या नव्या पिढीमध्ये संवेदनशीलता निर्माण करणारे उपक्रम शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये विचार, ज्ञान आणि सामाजिक भान विकसित होते. भाव–विचार, ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक परंपरेचे कवच विविध भाषांना लाभले आहे. या कवचाखाली देशाची सांस्कृतिक एकता सुरक्षित आहे. भाषेविषयी आत्मीयता निर्माण केली तर भाषा अधिक समृद्ध होईल. मात्र, भाषेच्या प्रश्नावरून वाद निर्माण होऊन अस्मिता व प्रतिष्ठेचे प्रश्न उपस्थित होतात, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

उपप्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग यांनी मातृभाषेबरोबरच हिंदी भाषेवरही राष्ट्रभिमानाने प्रेम करण्याचे आवाहन केले. विविध भाषा आणि साहित्य यांच्यामुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी हिंदी शिक्षक वर्षा आरु, पूनम त्रिपाठी, के. डी. भोसले, रीना लोंढे, अनिता सिद्धम यांचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धेतील गट १ मध्ये इयत्ता दहावी, अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या गटात प्रथम ओश्मी तंवर द्वितीय श्री. त्रिपाठी तर तृतीय आकांक्षा चतुर्वेदी उत्तेजनार्थ चैत्राली चौगुले या अनुक्रमे नंदलाल धूत इंग्लिश स्कूल आर्मी पब्लिक स्कूल व मानधना कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. गट २ मध्ये पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या गटात नगर कॉलेजच्या विद्यार्थिनी पूनम त्रिपाठी हिने प्रथम क्रमांक, निशा जांगिड हिने द्वितीय क्रमांक, रोहिणी गोरे हिने तृतीय क्रमांक, तर केशव गौड व अमृता नरोलिया यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. परीक्षक म्हणून निवृत्त प्राचार्य डॉ. विश्वासराव काळे, डॉ. निशात शेख यांनी काम पाहिले त्यांचा डॉ. पौर्णिमा बेहरे व भरत झंवर यांनी परिचय करुन दिला

कार्यक्रमाचे स्वागत नगर कॉलेजच्या हिंदी विभागप्रमुख ऋचा शर्मा यांनी केले. आडकर ट्रस्टचे सचिव अशोक कुरापट्टी यांनी आभार मानले. निशा जांगिड अमृता नरोलिया यांनी सूत्रसंचलन केले.


आयडियल मार्शल आर्टस्‌चे अनिकेत बिटला यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय पोलीस कराटे स्पर्धेत सुवर्णपदक पटकावल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक घनश्याम सानप आदी.

# जागतिक पोलीस कराटे स्पर्धेसाठी अनिकेत बिटला यांची निवड

**हैदराबाद राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक; ऑस्ट्रेलियातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी**

नगर – आयडियल मार्शल आर्टस्, अहिल्यानगरचे कराटेपटू आणि सध्या पुणे पोलीस दलात कार्यरत असलेले अनिकेत बिटला यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली. हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय पोलीस कराटे स्पर्धेत अनिकेत बिटला यांनी सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीच्या जोरावर त्यांची ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पोलीस कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अनिकेत बिटला हे केवळ कराटेपुरते मर्यादित नसून ज्युदो, तायक्वांदो आणि वुशू या मार्शल आर्टस् क्रीडा प्रकारांमध्येही राज्य व राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट खेळाडू म्हणून ओळखले जातात.

अनिकेत बिटला यांच्या या यशाबद्दल आयडियल मार्शल आर्टस् ग्रुपच्या वतीने वाडिया पार्क क्रीडा संकुलात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशिक्षक, मार्गदर्शक, राष्ट्रीय पंच तसेच राष्ट्रीय खेळाडूंनी अनिकेत यांच्या यशाचे कौतुक करून आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक घनश्याम सानप, अनिकेतचे प्रशिक्षक धर्मनाथ घोरपडे, कराटे संघटनेचे सचिव व मार्गदर्शक अमोल काजळे, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक दीपक धनवटे, राष्ट्रीय पंच सचिन कोतकर, राष्ट्रीय खेळाडू सतीश शिंदे, राष्ट्रीय खेळाडू रोहित काळे आणि राष्ट्रीय खेळाडू ओम सानप आदी उपस्थित होते.

# शासकीय चित्रकला परीक्षा एलिमेंटरी आणि इंटरमिजिएटमध्ये समर्थचा उल्लेखनीय सहभाग

नगर – सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला या शाळेत सुमारे १५ वर्षांपासून शासकीय चित्रकला ग्रेड एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचे केंद्र असून, २० ते २२ शाळा सहभागी होत असतात. प्रशालेचे अनेक विद्यार्थी महाराष्ट्र राज्य गुणवत्ता यादीत आले आहेत. प्रशालेचे दरवर्षी ३० ते ४० विद्यार्थी किंवा त्यापेक्षा जास्त विद्यार्थी ‘व ‘इ’ ग्रेडने उत्तीर्ण होतात. महाराष्ट्र राज्य कला मंडळातर्फे राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यात २ विद्यार्थी मागील वर्षी गुणवत्ता यादीत आले. ऊर्जा मंत्रालयातर्फे चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे.



या वर्षीही २२ शाळा सहभागी झाल्या असून, प्रशालेतील व इतर शाळांमधून १२४५ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. एकूण २० ब्लॉकमध्ये बसण्याची उत्तम व्यवस्था आहे. तसेच सर्वांसाठी स्वतंत्र बेंचेस असून काही विद्यार्थी स्वेच्छेने रंगकाम करण्यासाठी जमिनीवर बसतात.

प्रशालेतील कलाशिक्षक विवेक भारताल व श्रीमती स्वाती घुले हे परीक्षेचे नियोजन उत्तमरीत्या करीत असतात. त्यांना प्रशालेच्या प्राचार्या सौ. वसुधा जोशी व पर्यवेक्षिका सौ. शारदा होशिंग यांचे मार्गदर्शन लाभते.

संस्थेचे सर्व पदाधिकारी व शालेय समितीचे चेअरमन अ‍ॅड. किशोर देशपांडे यांनी प्रशालेच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सेक्रेड हार्टच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत ‘सेक्रेड हार्ट’च्या विद्यार्थ्यांचे यश

नगर – सेक्रेड हार्ट प्राथमिक शाळा, अहिल्यानगर येथील इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

इयत्ता सातवीतील श्रुती रवींद्र बडेकर हिने शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत सिल्व्हर मेडल पटकावले. तसेच याच वर्गातील समर गोपाल डेंगिया याने शालेय जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत ब्राँझ मेडल प्राप्त केले.

दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करत शाळेचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या मॅनेजर सिस्टर आयव्ही, शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर सेल्विना, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# एनपीडब्ल्यू फार्मोत्सव मध्ये गोरे पूर्वा हिचा प्रथम क्रमांक

नगर – National Pharmacy Welfare Association (NPW), India यांच्या वतीने पुणे येथे आयोजित NPW Pharmotsav 2026 या राज्यस्तरीय D.Pharm गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर येथील विद्यार्थिनी गोरे पूर्वा दत्तात्रय हिचा प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल गौरव करण्यात आला.



या कार्यक्रमात D.Pharm परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पूर्वा गोरे हिला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या यशासाठी प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रा. माधुरी पवार, प्रा. वृशाली गायकवाड, प्रा. शितल खंडागळे व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# गरमागरम पेस्तो पास्ता



झटपट रेसिपी

दोस्तांनो, पास्ता खाण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जाण्याची गरज नाही. तुम्ही घरच्या घरीच पेस्तो पास्ता बनवू शकता. या निमित्ताने मित्रमंडळींसोबत मस्त पास्ता पार्टीही करता येईल.

सामग्री: तीन कप पास्ता, चमचाभर ऑलिव्ह ऑईल, एक चमचा लसूण पेस्ट, एक सिमला मिरची, अर्धा कप फ्रेश क्रीम, पाव कप दूध, चमचाभर चिली फ्लेक्स, किसलेलं चीझ, मीठ.

पेस्तो सॉससाठी– पाव कप अक्रोड, वाटीभर बासिल, तीन चमचे ऑलिव्ह ऑईल, दोन लसूण पाकळ्या

कृती: पेस्तो सॉस बनवण्यासाठी सर्व घटक मिक्सरच्या भांड्यात घालून वाटून घ्या. पास्ता उकडून घ्या. आता एका कढईत ऑलिव्ह ऑईल घाला. थोडं गरम झाल्यावर त्यात लसूण पेस्ट घालून थोडं परतून घ्या. मग चिरलेली सिमला मिरची घालून परता. आता त्यात पेस्तो सॉस, फ्रेश क्रीम, दूध, चिली फ्लेक्स आणि मीठ घाला. दोन मिनिटं ढवळत रहा. यानंतर त्यात उकडलेला पास्ता घालून हलवून घ्या. दोन मिनिटं शिजू द्या. वरून किसलेलं चीझ घाला. गरमागरम खा.




## शेर की जुबानी

मंजिल का नाराज  
होना भी जायज था।  
हम भी तो अजनबी  
राहों से दिल लगा  
बैठे थे।

तुम नजर नहीं आते तो  
आजकल शाम नहीं ढलती।  
बस उदास सा है सबकुछ,  
दिल से दिल की बात नहीं  
निकलती।

मन का कोई  
कोना अंधेरे में  
ना रहे,  
एक चिराग भीतर  
भी जलाओ यारों।

# तरुणाचे उत्पन्न दीड कोटी?



अचिव्हर

परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द प्रबळ असेल आणि मेहनतीची साथ असेल, तर स्वप्नांचे शिखर गाठता येते. शशांक अग्रवाल यांची कहाणी याचेच प्रेरणादायी उदाहरण आहे.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातून आलेल्या शशांक यांनी अत्यंत मर्यादित साधनसामग्रीत शिक्षण घेतले 'जेईई ॲडव्हान्स' मध्ये देशात २० वी रँक मिळवली आणि प्रतिष्ठित 'आयआयटी' मुंबईत प्रवेश मिळवला. आज वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी त्यांचे वार्षिक उत्पन्न सुमारे दीड कोटी रुपये असल्याचा दावा विविध अहवालांमध्ये करण्यात आला आहे; मात्र या यशामागे केवळ शशांक यांची मेहनत नाही, तर त्यांच्या कुटुंबाचा संघर्ष आणि विशेषतः वडिलांचा त्यागही तितकाच महत्त्वाचा आहे. आज यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतर शशांक दर महिन्याला आपल्या आई–वडिलांना एक लाख रुपये पाठवत असल्याचेही सांगितले जाते.

शशांक यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम नव्हते. त्यांच्या वडिलांचे छोटे दुकान होते आणि त्यातून त्यांना दरमहा केवळ तीन ते चार हजार रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याचे वृत्त आहे. एवढ्या मर्यादित उत्पन्नात घर चालवताना मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी सांभाळणे हे मोठे आव्हान होते; मात्र परिस्थितीसमोर हार न मानता वडिलांनी मुलाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. शशांक यांच्या शिक्षणासाठी त्यांनी कर्जही घेतल्याचे सांगितले जाते. त्यामुळे 'आयआयटी' मुंबईपर्यंतचा शशांक यांचा प्रवास हा केवळ एका विद्यार्थ्याने मोठी परीक्षा उत्तीर्ण केल्याचा प्रवास नव्हता, तर एका कुटुंबाने केलेल्या संघर्षाचा आणि पालकांनी दिलेल्या त्यागाचा परिणाम होता.

शशांक यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर 'जेईई ॲडव्हान्स' परीक्षेत 'ऑल इंडिया रँक' अर्थात 'एआयआर' २० मिळवली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांना देशातील आघाडीच्या अभियांत्रिकी संस्थांपैकी एक असलेल्या 'आयआयटी'त प्रवेश मिळाला. त्यांनी तेथून 'कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंग' अर्थात 'सीएसई' या शाखेत बी. टेक. पदवी पूर्ण केली. 'जेईई डव्हान्स' मधील त्यांची २० वी रँक ही अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाची आणि कठोर परिश्रमाची फलश्रुती होती.

बी.टेक.चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर शशांक यांनी कॉर्पोरेट क्षेत्रात प्रवेश केला. अहवालांनुसार, ते सध्या 'झंस्कार कार्पोरेशन' या कंपनीत 'ॲनॅलिस्ट' म्हणून कार्यरत आहेत. विविध रिपोर्ट्सनुसार त्यांचे वार्षिक एकूण पॅकेज सुमारे दीड कोटी रुपये आहे. या पॅकेजमध्ये सुमारे ५५ लाख रुपयांचा बेसिक पगार आणि जवळपास ५० लाख रुपयांचा व्हेरिएबल पे किंवा परफॉर्मन्स बोनस असल्याचे सांगितले जाते. इतर वेतन घटक धरून त्यांचे एकूण रिपोर्टेड 'सीटीसी' सुमारे १.५ कोटी रुपये असल्याचा दावा करण्यात आला आहे. उपलब्ध माहितीनुसार, शशांक यांचे मासिक ग्रॉस उत्पन्न सुमारे ८.७५ लाख रुपये आहे. त्यातून प्राप्तिकर आणि इतर कपाती झाल्यानंतर त्यांच्या हातात दरमहा अंदाजे पाच लाख ८८ हजार रुपये उरतात. अहवालांमध्ये दरमहा सुमारे २.८३ लाख रुपये कर, ३,६०० रुपये ईपीएफ आणि २०० रुपये प्रोफेशनल टॅक्सच्या स्वरूपात कपात होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या हिशेबाने त्यांचे वार्षिक 'पोस्ट–टॅक्स टेक–होम' उत्पन्न सुमारे ७०.५४ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. त्यांच्या एका महिन्यातील कराची रक्कमही अनेक तरुणांच्या संपूर्ण वर्षाच्या उत्पन्नापेक्षा अधिक असल्याचे या उदाहरणातून दिसून येते.

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्सॲपमध्ये आता 'एआय'



जगातील सगळ्यात जास्त वापरले जाणारे 'इन्स्टंट मेसेजिंग ॲप' व्हॉट्सॲप आता फक्त मेसेज, व्हॉईस नोट्स किंवा व्हिडीओ कॉलपुरते मर्यादित राहिलेले नाही. व्हॉट्सॲपची पॅरेंट कंपनी 'मेटा'ने या प्लॅटफॉर्मवर प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'मेटा एआय' समाविष्ट केले आहे. या तंत्रज्ञानामुळे यूजर्स आता एका क्लिकवर आयडिया जनरेट करणे, फोटो तयार करणे आणि ट्रॅव्हल प्लॅनिंग करण्यासारखी अनेक कामे सहज करू शकत आहेत. व्हॉट्सॲपचा रोजचा वापर अधिक सोपा आणि स्मार्ट बनवणाऱ्या 'मेटा एआय'ची पाच प्रमुख फीचर्स :

* फोटो आणि कस्टम स्टिकर्स जनरेशन : चॅटजीपीटी किंवा जेमिनीप्रमाणेच आता व्हॉट्सप युजर्सना टेक्स्ट प्रॉम्प्टच्या मदतीने डायरेक्ट हाय–क्वालिटी फोटो तयार करण्याची सुविधा मिळाली आहे.

*इमेज जनरेशन : तुम्हाला हवा असलेला फोटो मराठी किंवा इंग्रजीत लिहून सांगताच मेटा एआय काही सेकंदांत तसा फोटो तयार करून देतो.

*कस्टम एआय स्टिकर्स: तुमच्या मूड किंवा भावनांनुसार युनिक एआय स्टिकर्स तयार करून ते चॅटमध्ये शेअर करता येतात.

*डीपी डिझायनिंग : व्हॉट्सॲपच्या प्रोफाईल पिक्चरसाठी (डीपी) क्रिएटिव्ह आणि युनिक डिझाईन्स तयार करणे आता अत्यंत सोपे झाले आहे.

मेटा एआय वैयक्तिक चॅटसोबतच ग्रुप चॅटमध्येही डिजिटल सहाय्यक म्हणून काम करतो.

*टॅगिंग सुविधा : कोणत्याही ग्रुप चॅटमध्य मेटा एआय असे टाईप करून तुम्ही एआयला थेट कोणतेही प्रश्न विचारू शकता.

## मोबाईल मॅनिया


### नवीन सिमकार्ड मिळणे अवघड



नवीन सिमकार्ड मिळवणे आता पूर्वीसारखे सोपे राहणार नाही. दूरसंचार विभागाने वापरकर्ता ओळखीसंदर्भात नवीन नियम जारी केले आहेत. नवीन सिम कनेक्शनसाठी आता बायोमेट्रिक पडताळणी आवश्यक असेल, म्हणजेच केवळ केवायसी कागदपत्रे सादर करणे यापुढे पुरेसे ठरणार नाही. नवीन नियमांनुसार, वापरकर्त्यांची ओळख बायोमेट्रिक पद्धतीनेदेखील पडताळली जाईल. यामध्ये बोटांचे ठसे, चेहऱ्याची वैशिष्ट्ये किंवा डोळ्यांच्या बाहुलीच्या माहितीचा समावेश असू शकतो.

केवळ नवीन सिमकार्डपुरतेच हे नियम मर्यादित नाहीत. वापरकर्त्याची माहिती अद्ययावत करताना, सिमकार्ड निष्क्रिय करताना आणि ओळख पुन्हा पडताळताना देखील बायोमेट्रिक पडताळणी आवश्यक असेल. सरकारच्या मते, यामुळे बनावट नावांनी मिळवलेले आणि खोट्या ओळखीखाली वापरले जाणारे सिमकार्ड रोखण्यास मदत होईल. आजकाल मोबाईल नंबर फक्त कॉल्स किंवा इंटरनेट वापरासाठीच नाहीत. ते बँकिंग, यूपीआय आणि इतर अनेक डिजिटल सेवांसाठीही वापरले जातात. त्यामुळे, मोबाईल कनेक्शन कोणाच्या नावाने नोंदणीकृत आहे, त्या व्यक्तीची अचूक ओळख पटवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. नवीन नियमांमुळे सिम कार्ड खरेदी करण्यापासून ते वापरकर्त्याची माहिती बदलणे आणि पुन्हा पडताळणी करण्यापर्यंत, ओळख पडताळणीची प्रक्रिया अधिक मजबूत होईल. याव्यतिरिक्त, दूरसंचार विभागाने मोबाईल कनेक्शनवर मर्यादा निश्चित केली आहे. नवीन नियमांनुसार, दूरसंचार कंपन्यांना नवीन मर्यादेपेक्षा जास्त मोबाईल कनेक्शन असलेल्या ग्राहकांना ओळखणे आवश्यक असेल. मिळालेल्या माहितीनुसार, एका व्यक्तीच्या नावावर जास्तीत जास्त नऊ मोबाईल कनेक्शन असू शकतात. जम्मू आणि काश्मीर, आसाम आणि ईशान्य सेवा क्षेत्रात ही मर्यादा सहा सिमची आहे. जर एखाद्या ग्राहकाच्या नावावर या मर्यादेपेक्षा जास्त मोबाईल कनेक्शन असतील, तर त्यांना ते अतिरिक्त नंबर निष्क्रिय करावे लागतील.

# आईसोबत खटके उडतात!



मॅच मेकिंग

गेल्या दोन वर्षांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. आम्ही दोघं सध्या पीएचडी करत असून वर्षभरापासून लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये आहोत. माझ्या आईला आमचं असं 'लिव्ह इन' मध्ये रहाणं पसंत नाही. माझे तिच्यासोबत खटके उडतात. मी तीन वर्षांचा असताना माझ्या पालकांचा घटस्फोट झाला. त्यानंतर तिनेच मला वाढवलं. सध्या मी शिकतोय. त्यामुळे माझ्या शिक्षणाचा खर्च तीच उचलते आहे. पण मी लिव्ह इनमध्ये रहायला सुरुवात केल्यापासून ती सारखी माझ्यावर चिडते. दुसरीकडे माझी मैत्रीणही विचित्रच आहे. आम्ही काही काळ आमच्या कुटुंबासोबत राहून आलो की आमच्यात मतभेद होतात. त्यातच माझी मैत्रीण खूप रागीट आहे. ती नेहमीच माझ्यावर हक्क गाजवण्याचा प्रयत्न करते. आई आणि मैत्रीण यांच्यामध्ये मी अडकून पडलोय. मला नैराश्य आलंय आणि काय करावं ते कळत नाही. मला मार्गदर्शन करा.

उत्तर : 'लिव्ह इन रिलेशनशीप' ही पूर्णपणे आधुनिक संकल्पना आहे. 'लिव्ह इन' म्हटलं की भल्याभल्यांचे डोळे विस्फारतात. आधीच्या पिढीला तर ही बाब फारशी मान्य होणार नाही. तसंच ही संकल्पना आपल्या भारतीय संस्कृतीत बसत नाही. त्यामुळे तुझ्या आईला लिव्ह इन रिलेशनशीप ही संकल्पना मान्य नसणं अगदी स्वाभाविक आहे. या नात्याबद्दल तू तिला सांग. तुझ्या भविष्यातल्या योजनांची माहिती दे. आई आणि पत्नी/मैत्रीण यांना जोडणारा धागा तूच आहेस. दोघींच्या कलाने घेऊन त्यांना समजावून सांग. शेवटी प्रत्येकाला आपल्या पद्धतीने जगण्याचा अधिकार आहे. पण इतरांची मतंही ऐकून घे.

# मातंग समाजातील युवतींना रशियात नोकरीची संधी



रोजगारवाटा

मातंग व तत्सम समाजातील युवतींना कौशल्य प्रशिक्षण देऊन परदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (आर्टी) एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे.

'आर्टी ओव्हरसीज प्लेसमेंट प्रोग्रॅम' संस्थेतर्फे सुरू करण्यात आला असून, याद्वारे समाजातील तब्बल ४० युवतींना रशियामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नोकरीची संधी मिळणार आहे. या विशेष उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी १८ ते २२ वयोगटातील पात्र युवतींनी त्वरित अर्ज करण्याचे आवाहन 'आर्टी'चे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे. प्रोग्रॅमद्वारे रशियामध्ये थेट अधिकृत नोकरीची हमी मिळणार आहे, तसेच विमान प्रवासाचे तिकीट आणि रशियातील निवासाची विनामूल्य व्यवस्था केली जाणार आहेत. निवड झालेल्या युवतींना रशियातील (तातारस्तान) येथील जागतिक दर्जाच्या औद्योगिक क्षेत्रात नोकरी दिली जाणार आहे.

**पात्रता व निकष**

वयोमर्यादा : १८ ते २२ वर्षे

शैक्षणिक पात्रता : किमान नववी उत्तीर्ण

इतर बाबी : वैध पासपोर्ट असणे आवश्यक आणि उमेदवार वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असावा.

# डेनिम शर्टचा स्टायलिश अंदाज

फॅशन पॅशन

दोस्तांनो, एक डेनिम शर्ट तुमचा लूक पूर्णपणे बदलू शकतो. तुम्ही हा शर्ट वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता. शर्ट एकच असला तरी वेगवेगळे लूक मिळवू शकता. चला तर मग डेनिमचा हा शर्ट कसा कॅरी करायचा ते पाहूया.



* नेहमीचा पांढरा शर्ट ठेवा बाजूला आणि डेनिम शर्टने कूल लूक मिळवा. कोणत्याही रंगाच्या चिनोजवर हा शर्ट कॅरी करता येईल. यासोबत व्हाईट स्नीकर्स घाला. स्टार्ट अपचे मालक कॅज्युअल मिटगला हा लूक कॅरी करू शकतात. यासोबतच डिनर कवा कॅज्युअल पार्टीलाही तुम्ही डेनिम शर्ट घालू शकता.

* डेनिम शर्ट आणि शॉर्टस हे कॉम्बिनेशनही छान दिसतं. तुम्ही न्यूट्रल रंगाची शॉर्टस विकत घ्या. त्यावर डेनिम शर्ट घाला. यासोबत ब्राउन रंगाच्या लोफर्स शोभून दिसतील. कॅज्युअल आउटिंगला हा लूक कॅरी करा.

* सौम्य रंगाचा डेनिम शर्ट आणि डार्क ब्लू जीन्स कॅरी करून डेनिम ऑन डेनिम लूक मिरवता येईल.

* डेनिम शर्टचा वापर लेअरिंगसाठीही करता येईल. पांढरा टी शर्ट त्यावर डेनिम शर्ट आणि ब्लॅक जीन्स हा पेहराव झक्कास दिसेल.

* काळ्या फॉर्मल पँटवर डेनिम शर्ट उठून दिसतो.

* मिक्स अँड मॅचचं तंत्र फक्त मुलींपुरतं मर्यादित नाही. मुलंही आता अशी फॅशन करत आहेत. डेनिम शर्ट ब्लेझर पँटसोबतही कॅरी करता येईल.

# व्यायामानंतरही का वाढतं वजन?



फिटनेस फंडा

दोस्तांनो, आपण व्यायाम सुरू करतो. व्यायाम सुरू केल्यानंतर खरं तर वजन कमी व्हायला हवं. पण सुरुवातीच्या टप्प्यात ते वाढलेलं दिसतं. व्यायाम सुरू केल्यानंतर साधारण आठवडाभरातच वजन कमी व्हावं अशी आपली अपेक्षा असते. मग आपण वजन काट्यावर उभे राहतो आणि आधीपेक्षा वाढलेलं वजन बघून आपले डोळे विस्फारतात. व्यायाम सुरू केल्यानंतर का वाढतं वजन? जाणून घेऊ.

* व्यायाम सुरू केल्यानंतर स्नायूंमध्ये वेदना जाणवतात. स्नायूंमधल्या टिश्यूंवर ताण आल्याने असं होतं. व्यायाम सुरू केल्यानंतर एक–दोन दिवसांनी हा त्रास सुरू होतो. यामुळे वजन थोडं वाढू शकतं. स्नायूंमधल्या या वेदना तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात आणि साधारण दोन आठवड्यांनी थांबतात.

* नव्या व्यायामाला सुरुवात केल्यानंतर स्नायू बचावात्मक पवित्रा घेतात. या टप्प्यात शरीरात पाणी साठून राहू शकतं. यामुळे स्नायू सुजल्यासारखे वाटतात. शरीरात पाणी साठून राहिल्याने वजन वाढतं.

* स्नायूंमध्ये पेशींसह पाणीही असतं. व्यायामाला सुरुवात केल्यानंतर स्नायूंचा आणि त्यातही पायाच्या स्नायूंसारख्या मोठ्या आकाराच्या स्नायूंचा आकार वाढू लागतो. पण फॅट्सच्या तुलनेत स्नायू कमी जागा व्यापतात. त्यामुळे वजन वाढलं तरी तुम्ही बारीक दिसता. अर्थात ही वजनवाढ वाईट नसते. उलट तुम्ही आधीपेक्षा जास्त तंदुरुस्त होता.

# कन्स्ट्रक्शन प्रोजेक्ट मॅनेजमेंटचा कोर्स



उच्च शिक्षण

पूर्ण देशासह परदेशातील बांधकाम क्षेत्रात कुशल सिव्हिल इंजिनिअर्स आणि आर्किटेक्टना मोठी मागणी असून, प्रत्यक्ष साइट व्यवस्थापन, आधुनिक सॉफ्टवेअर आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट यांसारख्या व्यावसायिक कौशल्यांची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. हीच वाढती गरज ओळखून 'इन्फिनी इन्स्टिट्यूट'ने 'कन्स्ट्रक्शन प्रोजेक्ट मॅनेजमेंट' या एक वर्षाच्या अभ्यासक्रमाची नोंदणी सुरू केली आहे.

'इन्फिनी इन्स्टिट्यूट'मार्फत बांधकाम प्रकल्प व्यवस्थापनातील हा अभ्यासक्रम दहा वर्षांपासून यशस्वीपणे राबविला जात आहे. आत्तापर्यंत चारशेहून अधिक विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. या विद्यार्थ्यांना 'ॲफकॉन्स', 'टाटा प्रोजेक्ट्स', 'स्टॅनटेक', 'कोलिअर्स इंटरनॅशनल', 'कुशमन अँड वेकफिल्ड', 'शापूरजी पालनजी', 'गोदरेज प्रॉपर्टीज' यासारख्या नामांकित कंपन्यांमध्ये विविध जबाबदाऱ्यांवर काम करण्याची संधी मिळाली आहे. या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सिव्हिल इंजिनीअरिंग आणि आर्किटेक्चर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानासोबतच उद्योगासाठी आवश्यक व्यवस्थापन कौशल्ये आणि प्रत्यक्ष प्रकल्पांचा अनुभव दिला जातो. त्यामुळे करिअरची योग्य दिशा मिळण्यास तसेच भविष्यात 'प्रोजेक्ट मॅनेजर'सारख्या पदांपर्यंत पोहोचण्यास विद्यार्थ्यांना मदत होते.

विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार 'इन्फ्रास्ट्रक्चर', 'इंडस्ट्रीअल अँड रिअल इस्टेट' क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही भर दिला जातो. अभ्यासक्रमामध्ये उद्योगांच्या गरजेनुसार 'एस्टिमेशन अँड बिलिंग', 'प्रोजेक्ट प्लॅनिंग अँड कंट्रोल', 'क्वालिटी अँड सेफ्टी', 'टेंडरिंग अँड कॉन्ट्रॅक्टिंग', 'प्रोजेक्ट मॅनेजमेंट' तसेच 'एमएस प्रोजेक्ट' आणि प्रायमावेरा यांसारख्या सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना बांधकाम प्रकल्पाच्या नियोजनापासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येतात.

# ३५९ शिवमूर्ती कोरलेले शिवलिंग

भटकंती

**सोलापूर शहरापासून अवघ्या ४० किलोमीटर अंतरावर असलेल्या हत्तरसंग कुडल येथील संगमेश्वर मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथील बहुमुखी शिवलिंग! हे मंदिर म्हणजे पुरातन काळातील एक ऐतिहासिक ठेवा असून, सीना आणि भीमा या दोन पवित्र नद्यांच्या ९० अंशांच्या दुर्मिळ काटकोन संगमावर वसलेले हे स्थान सामाजिक समतेचे प्रणेते महात्मा बसवेश्वर यांचे मुख्य जन्मस्थान मानले जाते.**

तब्बल ३५९ शिवमूर्ती कोरलेले शिवलिंग उत्खननात सापडले. असे बहुमुखी शिवलिंग असलेले जगातील एकमेव स्थान म्हणजे दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल.



येथील संगमेश्वर आणि हरीहरेश्वराच्या दर्शनाला श्रावण सोमवारी भक्तांची गर्दी होते.

सोलापूर शहरापासून अवघ्या ४० किलोमीटर अंतरावर असलेल्या हत्तरसंग कुडल येथील संगमेश्वर मंदिरात पहाटेपासूनच दर्शन आणि जलाभिषेकासाठी भाविकांची अलोट गर्दी असते. हे मंदिर म्हणजे पुरातन काळातील एक ऐतिहासिक ठेवा असून, सीना आणि भीमा या दोन पवित्र नद्यांच्या ९० अंशांच्या दुर्मिळ काटकोन संगमावर वसले आहे. हे स्थान सामाजिक समतेचे प्रणेते महात्मा बसवेश्वर यांचे मुख्य जन्मस्थान मानले जाते. त्यामुळे या संपूर्ण परिसराला ऐतिहासिक आणि सामाजिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व लाभले आहे. दक्षिण सोलापूरमधील बरूर, हत्तरसंग, कुडल, अक्कलकोटमधील धारसंग आणि कर्नाटकच्या इंडी तालुक्यातील शिरगुर या गावांच्या शिवपरंपरेशी या मंदिराचे नाते थेट जोडलेले आहे. या पुरातन मंदिर परिसरातील सर्वात मोठा ऐतिहासिक ठेवा आणि वैशिष्ट्य म्हणजे येथील भव्य शिवलिंग. ऐतिहासिक दस्तावेजांनुसार, हे जगातील एकमेव 'विश्वरूप दर्शन' शिवपिंड (मूर्ती) मानले जाते, ज्यावर ऐतिहासिकदृष्ट्या शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.



तब्बल साडेचार टन वजन असलेल्या या अद्भुत शिवपिंडीवर ३५९ लहान शिवरूप मूर्ती अत्यंत सुबकपणे कोरलेल्या आहेत. मंदिर परिसरात उत्खनन सुरू असताना १९९७ मध्ये हे शिवलिंग सापडले. हा प्राचीन शिल्पकलेचा एक अद्भुत आणि अद्वितीय नमुना आहे. या पवित्र पिंडीवर वर्षातून एकदा जरी अभिषेक केला, तर संपूर्ण वर्षभर शिवआराधना केल्याचे पुण्य आणि दीर्घायुष्य लाभते, अशी भाविकांची गाढ श्रद्धा आहे.

# अहमदनगर जिल्हा आयटकच्या सेक्रेटरीपदी ॲड. सुधीर टोकेकर

## कारभारी उगले अध्यक्ष; सुरेश पानसरे, सतीश पवार व उषा अडांगळे उपाध्यक्ष

नगर – अहमदनगर जिल्हा आयटकचे त्रैवार्षिक अधिवेशन अहिल्यानगर शहरातील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात उत्साहात पार पडले. कॉम. कारभारी उगले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनात जिल्हा सेक्रेटरी म्हणून ॲड. कॉम. सुधीर टोकेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. अध्यक्षपदी कॉम. कारभारी उगले यांची निवड झाली. तर उपाध्यक्षपदी कॉम. सुरेश पानसरे, कॉम. सतीश पवार आणि कॉम. उषा अडांगळे यांची निवड करण्यात आली.

ऑक्टोबर २०१९ मध्ये जिल्हा अधिवेशन झाल्यानंतर विविध कारणांमुळे पुढील अधिवेशनास विलंब झाला. सुमारे पाच ते सहा वर्षांनंतर झालेल्या या अधिवेशनात मागील कालावधीतील संघटनेच्या कामाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा सेक्रेटरी ॲड. कॉम. सुधीर टोकेकर यांनी मागील तीन वर्षांच्या कामाचा अहवाल अधिवेशनासमोर मांडला.

अहमदनगर जिल्ह्यात आयटकशी संलग्न असलेल्या विविध कामगार संघटनांच्या माध्यमातून कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ग्रामपंचायत कर्मचारी संघटना, पतसंस्था कर्मचारी संघटना, आशा व गटप्रवर्तक संघटना, अवतार मेहेर बाबा ट्रस्ट युनियन, मोहट देवी कामगार युनियन, मढी देवस्थान, लालगीर बाबा ट्रस्ट मंडळी, तलरेजा फर्म, पारनेर नगर पंचायत, मोलकरीण संघटना आदी विविध युनियन आयटकशी संलग्न आहेत. या संघटनांच्या माध्यमातून कामगारांना किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी (पीएफ), सेवाशर्ती लागू करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून, कामगारांच्या विविध प्रश्नांवर कामगार न्यायालयातही प्रकरणे दाखल करण्यात आल्याचे अधिवेशनात सांगण्यात आले.

अवतार मेहेर बाबा ट्रस्टमध्ये आयटकची लालबावटा युनिट कार्यरत आहे. या युनिटचे




अहमदनगर जिल्हा आयटकचे त्रैवार्षिक अधिवेशन पार पडले. यात अहमदनगर जिल्हा आयटकच्या सेक्रेटरीपदी ॲड. सुधीर टोकेकर, अध्यक्षपदी कारभारी उगले तर उपाध्यक्षपदी सुरेश पानसरे, सतीश पवार व उषा अडांगळे यांची निवड करण्यात आली.

अध्यक्ष कॉम्रेड सतीश पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच संघटनेचे ॲड. कॉम. टोकेकर आणि कॉम. सुभाष लांडे यांच्या माध्यमातून कामगारांसाठी तीन वर्षांचा करार करण्यात आला. या करारामुळे कामगारांना ४ हजार ८०० रुपयांची वेतनवाढ मिळवून देण्यात आल्याची माहिती अधिवेशनात देण्यात आली.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतन आणि पेन्शन योजनेसाठी आयटकचा लढा सुरू असून, सध्या १४ ते १५ हजार रुपये वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना २८ हजार रुपये वेतन मिळाले पाहिजे, अशी मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे आशा वर्कर आणि गटप्रवर्तक यांनाही २८ ते ३० हजार रुपये वेतन मिळावे, पेन्शन योजनेची अंमलबजावणी करावी आणि पेन्शनसाठी पूर्वीची ६५ वर्षांची वयोमर्यादा कायम ठेवावी, अशी मागणी करण्यात आली.

मढी देवस्थान तसेच लालगीर बुवा ट्रस्टमधील कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती लागू करून किमान वेतन मिळावे, यासाठीही संघटनेचा लढा सुरू असल्याचे सांगण्यात आले. जिल्ह्यात आयटक कामगार संघटनेचे सध्या सुमारे सात ते आठ हजार सभासद असल्याची माहिती देण्यात आली. कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार अधिवेशनात व्यक्त करण्यात आला.

अध्यक्ष कॉम. कारभारी उगले यांनी आपल्या भाषणात कामगारांनी संघटित होऊन अधिकाधिक लढे उभारण्याची गरज व्यक्त केली. कामगारांच्या सेवाशर्ती, वेतन आणि इतर न्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी संघटित शक्तीच्या माध्यमातून संघर्ष करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी ॲड. कॉम. सुधीर टोकेकर यांनी सांगितले की, देशातील आयटक ही कामगार क्षेत्रातील मोठी संघटना असून देशभरात तिचे सुमारे एक कोटी सभासद आहे. ३ व ४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे राज्य अधिवेशन होणार असून, त्यानंतर बंगळुरू येथे राष्ट्रीय अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनांमध्ये कामगारांच्या विविध प्रश्नांवर आणि संघटनात्मक विषयांवर चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिवेशनात जिल्हा कार्यकारिणीच्या विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. जिल्हा सेक्रेटरी म्हणून ॲड. कॉम. सुधीर टोकेकर, अध्यक्ष म्हणून कॉम. कारभारी उगले, तर उपाध्यक्ष म्हणून कॉम. सुरेश पानसरे, कॉम. सतीश पवार आणि कॉम. उषा अडांगळे यांची निवड झाली. सहसेक्रेटरी म्हणून आशा गटप्रवर्तक संघटना, शेवगाव तालुक्यातील प्रमुख कॉ. संदीप इथापे यांची निवड करण्यात आली. तसेच लंका पठाडे यांचीही सहसेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. खजिनदार म्हणून वर्षा चव्हाण यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून कॉम. मारुती सावंत, कॉम. निवृत्ती दातीर, विडी युनियनच्या सुमित्रा जिंदम, आशा देशमुख, जयश्री गुरव, आशा मगर, सुवर्णा देशमुख, विजय सोनवणे, सौ. गोयर, कॉम. मारुती दहिफळे, विद्या मुंढेकर आणि सौ. घोरपडे (राहुरी) यांची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून कॉम. प्रताप सहाणे आणि कॉम. ॲड. सुभाष लांडे (राज्य सचिव, भाकप) यांची निवड झाली.

तंबाखू कामगार युनियनमधील कार्याबद्दल कॉम. प्रताप सहाणे यांना समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा अधिवेशनात सत्कार करण्यात आला. तसेच बिडी युनियनमधील योगदानाबद्दल कॉम. निवृत्ती दातीर यांचाही सत्कार करण्यात आला. उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल कॉम. उषा अडांगळे, कॉम. सतीश पवार आणि आशा व गटप्रवर्तक संघटनेचे कार्याध्यक्ष कॉम. सुरेश पानसरे यांचा त्यांच्या कामातील योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी कॉम. उषा अडांगळे आणि लंका पठाडे यांनी मनोगत व्यक्त केले. अधिवेशनाची निवड समिती म्हणून कॉम्रेड सुधीर टोकेकर, कॉम्रेड कारभारी उगले आणि श्रीमती लंका पठाडे यांनी कामकाज पाहिले. सूत्रसंचालन कॉम. सुरेश पानसरे यांनी केले. कॉम. संदीप इथापे यांनी आभार मानले.



## गुरुवाणी – ६५
## पूर्ण ताकद लावा...

केवळ तपस्या, संघ, परिवार असला म्हणजे उपयोग नाही. त्यात शक्ती हवी. सुधर्मा स्वामी वेगवेगळ्या गाथांमध्ये याविषयी चर्चा करतात. जे जे काम हाती घेतले त्यात तीर्थंकरांनी आपली पूर्ण ताकद लावली. एका पौर्णिमेला चंद्रोदय होत असताना तीर्थंकर एका लहान दगडावर लक्ष केंद्रित करून उभे होते. त्यांनी संकल्प केला की, मी सुर्योदय होईपर्यंत या दगडाकडे पापणी न लवता एकाग्र होऊन पाहत राहिल. संकल्प केला आणि लगेच क्रीया सुरू केली. त्यांच्या या साधनेचे स्पंदन थेट देवलोकात पोहचले. शकरेंद्रला देवलोकात ते स्पंदन जाणवले. इंद्र सिंहासनावरून उठला आणि तीर्थंकरांना मनोभावे वंदन करू लागला. ते पाहून इतर देवही वंदना करू लागले. त्यावेळी एक संगम देव अस्वस्थ झाला. वंदनेनंतर इंद्राला संगमने विचारले, 'सभा सोडून तुम्ही कोणाला वंदन करत होता' ?. इंद्राने नाव सांगितले, ते वर्धमान महावीर आहेत. संगमने त्या साधनेची खिल्ली उडवली. इंद्र म्हणाला, 'तीर्थंकर जी साधना करत आहेत, ती अद्भुत आहे.' संगमने तरीही ही साधना भंग होऊ शकते असे म्हटले. इंद्राने सांगितले, 'जगातील कोणतीही ताकद तीर्थंकरांचा संकल्प तोडू शकत नाही'. संगमने हे आव्हान समजून साधना भंग करून दाखवतो असे म्हटले. तो झंझावाती वादळ घेऊन तीर्थंकरांकडे आला. पण या वादळातही महावीरांची दगडावरून नजर हटली नाही. विशेष म्हणजे दगडही हलला नाही. संगम रात्रभर साधनेत व्यत्यय आणत राहीला. सूर्योदय झाला. भगवान महावीरांचा संकल्प पूर्ण झाला ते तिथून निघाले. पण संगम सारख्यांना दुसऱ्याची प्रशंसा ऐकली की मळमळ होते. परमात्म्याकडे कायम वरदान मागा. सज्जनांशी माझी मैत्री व्हावी, श्रेष्ठांना पाहिल्यावर मला आनंद होईल, कोणी दुःखी भेटला तर त्याला मी आधार देऊ शकेल आणि माझ्या विचारांशी सहमत नसलेला भेटला तर मी तटस्थ होईल. संगम अनुभवानेही सुधारला नाही. तो सहा महिने महावीरांना प्रचंड त्रास देत राहिला. पण महावीरांनी त्याच्या कोणत्याच क्रियेला प्रतिसाद दिला नाही. कारण महावीरांचा संकल्प होता की, कोणाही प्रती माझ्यात निगेटिव्ह भाव असणार नाही. म्हणून सुधर्मा स्वामी महावीरांना सुमेरू पर्वत म्हणतात. तुम्हाला आयुष्यात जे चांगले करायचे ते पूर्ण एनर्जी लावून करायचे आहे. निर्वाण कल्याणक अनुष्ठान, जिनेश्वरी आराधना पूर्ण शक्ती लावून करायची.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# अखंड भारत आणि सामाजिक जागृतीचा संदेश देत १० हजार किलोमीटरच्या पदयात्रेवर निघाले राजाबाबू



शनिशिंगणापूर येथे शनि देवाचे दर्शन करुन येताना राजाबाबू.

नगर – अखंड भारताची संकल्पना, सामाजिक जागृती आणि विश्व कल्याणाच्या उद्देशाने बिहारमधील राजाबाबू यांनी ६ जूनला मुजफ्फरपूरच्या कालीबाडी वैष्णो मंदिरातून १० हजार किलोमीटर लांबीच्या पदयात्रेची सुरुवात केली आहे. ही त्यांची चौथी पदयात्रा असून, या पदयात्रेतून सामाजिक एकता, देशात शांतता नांदावी, लोकांमध्ये बंधूभाव वाढावा, बिहारचा विकास व्हावा आणि प्रत्येक जिल्ह्यात शासनाने वृद्धाश्रम सुरु करावेत, या उद्देशाने त्यांनी ही यात्रा सुरु केली आहे. या पदयात्रेत राजाबाबूंनी शिर्डीचे साईबाबा, शिंगणापूरचे शनिमंदिर येथे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी अहिल्यानगरमध्ये मुक्काम केला. त्यानंतर ते कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाले.

राजाबाबू यांचे मूळ गाव मुजफ्फरपूर जिल्ह्यातील जगदीशपूर हे असून, मुजफ्फरपूर येथील कालीबाडी वैष्णो मंदिरात ६ जून रोजी दर्शन घेत त्यांनी पदयात्रेला प्रारंभ केला. ही पदयात्रा पाटणा, राजगीर, गया, उज्जैन, नाशिक, शिर्डी, शनिशिंगणापूर अशा देवस्थानांचे दर्शन २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी अहिल्यानगरमध्ये पोहोचली. अहिल्यानगरमध्ये रात्री मुक्काम करुन त्यांनी २६ सप्टेंबर रोजी अहिल्यानगरमधून ते कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाले. कोल्हापूरच्या शक्तीपिठाचे दर्शन करुन ते मुंबईच्या सिद्धीविनायक दर्शनासाठी पोहोचणार आहेत. त्यानंतर ते माता वैष्णो देवीच्या दर्शनासाठी जाणार आहेत. त्यांची ही संपूर्ण पदयात्रा सुमारे १० हजार किलोमीटर लांबीची असून, मार्च २०२७ पर्यंत ही यात्रा पूर्ण होण्याचा अंदाज त्यांनी वर्तवला आहे.

दरम्यान दैनिक नवामराठाशी बोलताना त्यांनी सांगितले, बिहारच्या प्रत्येक जिल्ह्यात शासनाने वृद्धाश्रम आणि अनाथ आश्रम सुरु करावेत, मागणी बिहार सरकारकडे केली आहे. प्रत्येक मानवाचे कल्याण व्हावे, देशात शांतता नांदावी, समता वाढीस लागावी आणि लोकांमधील वैयक्तिक कटूता संपून बंधूभाव वाढीस लागवा, अशी प्रार्थना आपण यात्रेदरम्यान प्रत्येक ठिकाणी दर्शनासाठी गेल्यानंतर करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या पदयात्रेच्या प्रवासाबाबत माहिती देताना ते म्हणाले, यापूर्वी आपण ३ पदयात्रा पूर्ण केल्या आहेत. या तीन पदयात्रांच्या माध्यमातून एकूण १३ हजार ५०० किलोमीटर अंतर कापले असून नेपाळमध्ये आंतरराष्ट्रीय सन्मानही मिळाला आहे. पहिली पदयात्रा १६ जानेवारी २०२३ रोजी मुजफ्फरपूर ते माता वैष्णो देवी (२,५०० किमी, ८५ दिवसांत पूर्ण), दुसरी पदयात्रा २ डिसेंबर २०२३ रोजी सुरु होऊन ११ शक्तिपीठांचे दर्शन घेत ११५ दिवसांत ४ हजार किलोमीटर अंतर पार केले. तिसरी पदयात्रा ७ सप्टेंबर २०२४ रोजी पुनौरा धाम, सीतामढी येथून नेपाळ मार्गे सुरू झाली. या पदयात्रेत भारताच्या ४१ शक्तीपीठांचे दर्शन घेत ७ हजार किलोमीटर अंतर पूर्ण केले. या पदयात्रेचा शेवट २८ एप्रिल २०२५ रोजी माता वैष्णो देवी दर्शनाने करण्यात आला.

आता ही चौथी यात्रा असून, वेगवेगळ्या राज्यातील महत्वाच्या देवस्थानांचे दर्शन करीत तब्बल १० हजार किलोमीटर अंतर पार करुन माता वैष्णो देवीच्या दर्शनासाठी जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्ट आयोजित निबंध स्पर्धेचे ३० सप्टेंबरला बक्षीस वितरण



नगर – पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विनामूल्य निबंध स्पर्धेला प्रतिसाद मिळाला. शहरातील विविध शाळांमधील तसेच विविध भागांतून स्पर्धकांनी या निबंध स्पर्धेत सहभाग नोंदविला.

इयत्ता ५वी ते ७वी तसेच इयत्ता ८वी ते १०वी या दोन गटांमध्ये मिळून सुमारे ३७० स्पर्धकांनी सहभाग घेतला. तर खुल्या गटातील स्पर्धेत सुमारे ८० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. अशा प्रकारे एकूण ४५० स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेत आपल्या लेखनकौशल्याचा परिचय करून दिला.

यावेळी फाउंडेशनचे अमोल गुंडू म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला वाव मिळावा तसेच गणेशोत्सवाच्या सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय पैलूंवर विद्यार्थ्यांसह नागरिकांनी विचारमंथन करावे, या उद्देशाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद पाहता हा उपक्रम यशस्वी झाला असून भविष्यातही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, दातरंगे मळा, नेप्ती नाका जवळ, अहिल्यानगर येथे होणार आहे.

स्पर्धेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, अजय लयचेट्टी, अमोल गुंडू, श्रीनिवास बुरगुल, राजेंद्र बुलबुले, मयूर जिंदम आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीनिवास बुरगुल यांनी केले. गणेश लकशेट्टी यांनी आभार मानले.

# चैताली बुधानी आणि ईश्वरी वाळुंज यांना 'विद्याकिरण गर्ल चाइल्ड प्रिसिएशन ॲवॉर्ड'

नगर – एडीओआरई आणि गर्ग फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'विद्याकिरण गर्ल चाइल्ड प्रिसिएशन अवॉर्ड'साठी नगरमधील द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी चैताली बुधानी (इयत्ता १० वी) आणि ईश्वरी वाळुंज (इयत्ता ९ वी) यांची निवड करण्यात आली आहे.



चैताली बुधानी आणि ईश्वरी वाळुंज यांना 'विद्याकिरण गर्ल चाइल्ड प्रिसिएशन ॲवार्ड' मिळाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द तसेच वैयक्तिक विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत दोन्ही विद्यार्थिनींची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. अभ्यासासोबतच आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि विविध उपक्रमांमधील सहभागातून स्वतःचा सर्वांगीण विकास साधण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा या सन्मानातून गौरव करण्यात आला आहे.

'विद्याकिरण गर्ल चाइल्ड प्रिसिएशन अवॉर्ड' हा मुलींच्या गुणवत्तेला, कर्तृत्वाला आणि प्रगतीच्या वाटचालीला प्रोत्साहन देणारा उपक्रम आहे. त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या दीपिका नगरवाला यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थेच्या अध्यक्षा मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, ट्रस्टी निर्मल मुथा, अमित मुथा यांनी या यशाबद्दल विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

हा सन्मान शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेल्या बांधिलकीची साक्ष देणारा ठरला.

# जायंटस् ग्रुप व पशुसंवर्धन विभागातर्फे रेबीज डे साजरा; ९० प्राण्यांचे लसीकरण

नगर – जागतिक रेबीज दिनानिमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, अहिल्यानगर व जायंटस् ग्रुप ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत रेबीज लसीकरण व जंतनाशक वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जुन्या बस स्थानकाजवळील जिल्हा पशु सर्व चिकित्सालयात (जनावरांचा दवाखाना) सुमारे ९० पाळीव प्राण्यांची म्हणजेच श्वान, मांजर, घोडे, शेळ्या, गाई यांची तपासणी करून रेबीज लसीकरण करण्यात आले, अशी माहिती जायंटस् वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी दिली.



यावर्षीची थीम Stronger Together - एकत्रितपणे अधिक मजबूत अशी होती, असे प्रतिपादन सहाय्यक आयुक्त डॉ. मुकुंद राजळे यांनी केले. भारतासह जगात रेबीज आजार झपाट्याने वाढत आहे. या आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी व त्याबद्दल जागृती करण्यासाठी रेबीज डे साजरा केला जात आहे. दरवर्षी रेबीज आजाराने देशात २१ हजार नागरिक मृत्युमुखी पडत असल्याचे जिल्हा उपायुक्त डॉ. उमेश पाटील यांनी सांगितले.

यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल जाधव, डॉ. प्रशांत लोंढे, डॉ. सुधाकर गिते (फिरता दवाखाना), डॉ. उत्कर्ष कातकडे (निर्बीजीकरण केंद्र), संजय कवीटकर आदींनी श्वानांचे लसीकरण केले.

पाळीव प्राण्यांची काळजी घेणे ही प्राणीपालकांची जबाबदारी असून त्यांचे लसीकरण वेळेवर झाल्यास पाळीव प्राण्यांसह त्यांच्या पालक कुटुंबियांचे आरोग्य देखील सुरक्षित राहते, असे डॉ. अमोल जाधव यांनी सांगितले.

याप्रसंगी जायंटस् ग्रुपचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, अनिल गांधी, अभय मुथा, दर्शन गुगळे, पराग गांधी व उद्योगपती अभिजित गांधी, विनोद गांधी आदी उपस्थित होते. तसेच खाजगी सेवादाता कार्तिक शिंगाटे, गणेश गव्हाणे, विशाल ढगे, प्रणव गडाख, मानस चितांबर, कांचन कवडे, तन्मय शेवाळे, जगदीश बोरुडे यांनी परिश्रम घेतले.

# नगर व श्रीरामपूर येथे एकाच दिवशी जुगार व गावठी हातभट्टीवर १३ छापे

नगर – नगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती काढून कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेस दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदारांचे दोन विशेष पथक तयार करून त्यांना अवैध व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत सूचना व मार्गदर्शन देऊन रवाना केले होते. २८ सप्टेंबर रोजी या पथकाने कोतवाली, श्रीरामपूर शहर व श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत जुगार आणि गावठी हातभट्टी सुरू असलेल्या ठिकाणांची माहिती काढून एकाच दिवशी एकूण १३ ठिकाणी छापे कारवाई केली.



पथकाने केलेल्या या कारवाईमध्ये संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये एकूण १३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, या कारवाईदरम्यान एकूण १८ हजार ९९० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत जुगाराचे ४ गुन्हे दाखल करून ४ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तसेच गावठी हातभट्टीचा १ गुन्हा दाखल करून ३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला. याशिवाय श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन हद्दीत जुगाराचे ६ गुन्हे दाखल करून ७ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल आणि श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत जुगाराचे २ गुन्हे दाखल करून २ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, योगेश भिंगारदिवे, पंकज व्यवहारे, सतीष भवर, अतुल लोटके, अभिजीत अरकल, रमीजराजा आतार, आजिनाथ पाखरे यांनी केली आहे.

# डॉ.विठ्ठलराव विखे पाटील इंजिनिअरिंग महाविद्यालयाचे सुयश

नगर – इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया अहिल्यानगर लोकल सेंटर तर्फे आयोजित ५९ व्या इंजिनियर्स डे याप्रसंगी उत्कृष्ट काम करणाऱ्या अभियंतांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलाद स्टील, जालना कंपनीचे एम. डी. द्विज काबरा, सी.क्यू.ए.व्हि.कंट्रोलर ब्रिगेडियर राजीव शुक्ला, अडसूळ टेक्निकल कॅम्पसचे चेअरमन डॉ.अनिरुद्ध अडसूळ, अहिल्यानगर लोकल सेंटरचे चेअरमन इंजिनियर भारत भूषण भागवत आदी उपस्थित होते. यांचे मानद सेक्रेटरी डॉ.दीपक विधाते यांनी स्वागत करून संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अभियांत्रिकी क्षेत्र, शैक्षणिक, सामाजिक, औदयोगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या गुणवंत अभियंताचा विशेष गौरव याप्रसंगी करण्यात आला.

यामध्ये डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील डॉ. प्रशांत नरवडे यांचा आऊटस्टँडिंग इंजिनियर हा महत्वाचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. इलेक्ट्रिकल विभागातील डॉ. सौ. माधवी नेरकर यांना लेडी इंजिनियर हा पुरस्कार देण्यात आला. उच्चशिक्षित व अनुभवी प्राद्यापक हे डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय चे भूषण आहे हे पुन्हा एकदा दिसून आले. असे प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर यांनी आपल्या सांगितले.

५९ व्या अभियंता दिनानिमित्त आयोजित केल्या गेलेल्या पेपर सादरीकरण या स्पर्धेमध्ये देखील डॉ. विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले. इंजीनियरिंग एक्सलन्स ही यावर्षीची मुख्य संकल्पना होती. ज्यावर विद्यार्थ्यांनी त्यांचे पेपर व प्रोजेक्ट सादर केली. चतुर्थ वर्ष माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थिनी पूजा कोतकर, सुहानी कनेरकर यांनी द्रितीय क्रमांक तर तिसऱ्या वर्षातील समृद्धी बनकर व श्रावणी बडवे या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. विजेत्या विद्यार्थीना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक, सन्मानचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेणाऱ्या कार्यक्रम समन्वयक प्रा. सौ.पूजा वैकर व प्रा.सौ प्राजक्ता डोलारे यांचा पाहुण्यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

